रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ४९
www.ramprahar.com
बुधवार, ४ सप्टेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

'ई-गव्हर्नन्समुळे कमी वेळेत रक्कम थेट खात्यात जमा'/२
गणेशमूर्तींवर कारागिरांचा फिरतोय अखेरचा हात/६
बांगलादेशचा पाकिस्तानवर ऐतिहासिक मालिका विजय/८

## 'लाडकी बहीण योजनेत गैरप्रकार करणाऱ्यांना तुरूंगात टाकणार'



**मुंबई :** राज्यात सध्या लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज भरले जात आहेत. दोन कोटींहून अधिक महिला या योजनेसाठी पात्र ठरल्या आहे, मात्र या योजनेच्या अर्जप्रक्रियेदरम्यान गैरप्रकार झाल्याच्या घटना पुढे आल्या आहेत. साताऱ्यात एका व्यक्तीने ३० जणांच्या आधार कार्डचा गैरवापर करून तब्बल ३० अर्ज भरले आहेत. दरम्यान, गैरप्रकार करणाऱ्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी इशारा दिला आहे. मुंबईत माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री म्हणाले की, लाडकी बहीण योजना गोरगरीब सर्वसामान्य कुटुंबातील महिलांसाठी असून यात कोणताही गैरप्रकार खपवून घेतला जाणार नाही. साताऱ्याच्या जिल्हाधिकाऱ्यांशी मी चर्चा केली आहे. या योजनेत कोणीही भ्रष्टाचार केला, तर तो खपवून घेतला जाणार नाही. आरोपींना थेट तुरूंगात टाकले जाईल.

# एसटी संप : आज सीएमसोबत बैठक

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ अर्थात एसटी कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी संप पुकारला आहे. या संपावर तोडगा काढण्यासाठी बुधवारी (दि. ४) सह्याद्री अतिथिगृहात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत कृती समितीची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे.



राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणेच एसटी कर्मचाऱ्यांना वेतन मिळावे, प्रलंबित महागाई भत्ता आणि फरक, वाढीव घरभाडे भत्ता आणि फरक, वेतनवाढीच्या दराचा फरक तसेच ४८४९ कोटी रुपयांमधील शिल्लक रकमेचे वाटप, नुकत्याच मूळ वेतनात जाहीर केलेल्या पाच हजार, चार हजार आणि अडीच हजार रुपयांऐवजी सरसकट पाच हजार रुपये हजार मिळावेत अशा मागण्या एसटी कर्मचाऱ्यांकडून करण्यात आल्या आहेत.

ऐन गणेशोत्सवात प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी संप मागे घेण्याची विनंती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली होती, मात्र मागण्या पूर्ण होत नाहीत तोपर्यंत संपावर ठाम राहणार असल्याची भूमिका एसटी कर्मचारी संघटनांनी घेतली. त्यामुळे या बैठकीत तोडगा निघू शकला नाही. आता बुधवारी संध्याकाळी सह्याद्री अतिथिगृहात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत कृती समिती चर्चा करणार आहे. या बैठकीत मुख्यमंत्री संपाबाबत काय भूमिका घेणार आणि मुख्यमंत्र्यांसोबतच्या चर्चेनंतर संपावर तोडगा निघणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून विकासाचा धडाका



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

## पनवेल तालुक्यात विविध कामांचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून विकासकामांचा झंझावात सुरू आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांना विविध सोयीसुविधा उपलब्ध होत असून विकासाची अनेक कामे मार्गी लागत आहे. त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या २५:१५ निधीतून सुमारे ७८ लाख रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते मंगळवारी (दि. ३) करण्यात आला.

पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सातत्याने नागरिकांना सुविधा देण्यासाठी विकासकामांना प्राधान्य दिले आहे. त्यानुसार त्यांच्या २५:१५ या आमदार निधीतून शिरवली ग्रामपंचायत हद्दीतील आंबे गावात अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण (१० लाख रुपये), चिंचवली गावात गटार बांधकाम आणि रस्ता काँक्रीटीकरण (१० लाख रुपये), चिंचवली अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण (१० लाख रुपये), शिरवलीतील अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण (१० लाख रुपये), शिरवली येथील यशवंत पाटील ते कमलाकर भोईर यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण (आठ लाख रुपये), खानावमधील अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण (२० लाख रुपये) आणि महालुंगी येथील अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण (१० लाख रुपये) करण्यात येणार आहे. या विकासकामांचे भूमिपूजन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमांना भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, मयुर कदम, सुनील पाटील, शिरवली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तुकाराम पाटील, खानाव ग्रामपंचायत सरपंच निलम आरिवले, उपसरपंच बाळाराम पाटील, सदस्य हरिश्चंद्र गोंधळी, चिंध्रण पंचायत समिती विभागीय अध्यक्ष पांडुरंग पाटील, भगवान खानावकर, राम पाटील, भास्कर उलवेकर, हिरा निरगुडा, तुकाराम उघडा, एकनाथ रंधवी, रेश्मा पाटील, रेखा पाटील, वैशाली रंधवी, गिरीजा रंधवी, परशुराम रिकामे, लहू मुंडे, शिवाजी ठोंबरे, फुलचंद पाटील, दीपक रिकामे, संतोष मुंडे, कृष्णा बोलाडे, मच्छिंद्र खाने, दीपक बोंडे, गुरू ठोंबरे, गोटीराम रिकामे, ऋतिक मुंढे, राहुल रिकामे, महेंद्र खाने, बूथ क्रमांक ४०चे अध्यक्ष मनोहर अरिवले, युवा कार्यकर्ता उमेश बडेकर, भूषण फराड, गणेश वाघे, दिलीप वाघे, राजू गोंधळी, माणिक बोलाडे, वंदना तवले, मंदा बोलाडे, संध्या बोलाडे, सुमन पाटील, अलका खाने, शानू तवले, छाया बोलाडे, तानाजी अरिवले, ज्येष्ठ नागरिक बाळाराम पाटील, शशिकांत दिसले, बाळाराम पाटील, दत्तात्रेय वारदे, अनिल फराड, हरिश्चंद्र वारदे, रवी पाटील, प्रशांत बोलाडे, गणेश भाग्यवंत, योगेश पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते. या विकासकामांबद्दल आमदार प्रशांत ठाकूर व भाजपचे आभार मानण्यात आले.




**मुंबई : महाराष्ट्र विधान परिषदेच्या शतकमहोत्सवी वर्षानिमित्त मंगळवारी आयोजित कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सन्मान केला.**

## जयदीपविरोधात लूकआऊट नोटीस

**मालवण : प्रतिनिधी**



येथील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यानंतर फरार असलेला शिल्पकार जयदीप आपटे याच्याविरोधात पोलिसांकडून लूकआऊट नोटीस जारी करण्यात आली आहे.

जयदीप आपटे हा कल्याण परिसरात वास्तव्याला होता. २६ ऑगस्टला शिवरायांचा पुतळा पडल्याची माहिती समोर आल्यापासून जयदीप गायब आहे, तर दुसरीकडे बांधकाम सल्लागार डॉ. चेतन पाटील याच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल होऊन त्याला अटकही झाली. तो सध्या पोलीस कोठडीत आहे. फरारी जयदीपच्या शोधासाठी सिंधुदुर्ग पोलिसांनी सात पथके रवाना केली आहेत.

## निवडक

### तटरक्षक दलाचे हेलिकॉप्टर कोसळून तीन जण बेपत्ता

**पोरबंदर :** गुजरातमधील पोरबंदरजवळ अरबी समुद्रात अडकलेल्या जहाजाच्या मदतीसाठी गेलेले भारतीय तटरक्षक दलाचे हेलिकॉप्टर अपघातग्रस्त झाले आहे. या हेलिकॉप्टरमध्ये चार जण होते. त्यापैकी एका व्यक्तीला (डायव्हर) बचाव पथकाने वाचवले, तर दोन्ही पायलट बेपत्ता आहेत. दरम्यान, अरबी समुद्रात हेलिकॉप्टरचे अवशेष सापडले आहेत. त्याच्या आसपास शोधमोहीम सुरू आहे.

### छत्तीसगडमध्ये चकमकीत नऊ नक्षलवाद्यांचा खात्मा

**दंतेवाडा :** छत्तीसगडमधील दंतेवाडा येथे झालेल्या चकमकीत लष्कराच्या जवानांनी नऊ नक्षलवाद्यांचा खात्मा केला आहे. सुरक्षा दलांना दंतेवाडा-विजापूर सीमेवर मोठ्या प्रमाणात नक्षलवादी उपस्थित असल्याची माहिती मिळाली होती. यानंतर सीआरपीएफ आणि डीआरजीच्या तुकड्या गस्तीसाठी पाठवण्यात आल्या. या वेळी नक्षलवाद्यांनी गोळीबार सुरू केला. जवानांनी त्यास चोख प्रत्युत्तर दिले. यामध्ये नऊ नक्षलवादी ठार झाले आहेत.

# गणेशभक्त चाकरमान्यांचा प्रवास होणार सुखकर!

## मुंबई-गोवा महामार्ग सुस्थितीत आणण्याचे काम युद्धपातळीवर सुरू

**अलिबाग : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या आदेशाची महामार्ग प्राधिकरण आणि ठेकेदारांकडून युद्धपातळीवर अंमलबजावणी सुरू झाली असून मुंबई-गोवा महामार्गावरील खड्डे भरण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. रायगड जिल्ह्यातून जाणाऱ्या या महामार्गाच्या बहुतांश दुरूस्तीची कामे येत्या दोन दिवसांत संपणार आहेत. त्यामुळे गणेशोत्सवासाठी कोकणात येणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास यंदा सुखकर होण्याच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

गणेशोत्सव अवघ्या चार दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे मुंबई, ठाणे, नवी मुंबईसारख्या महानगरात राहणाऱ्या कोकणवासीयांनी कोकणातील मूळ गावांचे वेध लागले आहेत. ४ तारखेला रात्रीपासून गणेशभक्त कोकणात जायला निघणार आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासकीय तयारी पूर्ण झाली असून महामार्ग दुरूस्ती अंतिम टप्प्यात आली आहे.



मुंबई-गोवा महामार्गाच्या रखडलेल्या कामामुळे तसेच दुरवस्थेमुळे यंदाही महामार्गावर खड्डेमय प्रवास असेल अशी धास्ती गणेशभक्त आणि प्रवाशांना होती, मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या महामार्ग पाहणी दौऱ्यानंतर यंत्रणा खड्डे दुरुस्तीच्या कामाला लागल्या आहेत. ज्या ठिकाणी रस्त्याचे काम रखडले आहे तिथे खड्डे भरण्याबरोबरच डांबरीकरणाचे काम करण्यात येत आहे. महामार्गावर टेमपाले येथे पुलाचे थोडे बाकी आहे, तर लोणेरे येथील उड्डाणपुलाचे काम रखडले असल्याने या ठिकाणी पेव्हर ब्लॉक्स टाकून आणि डांबरीकरण करून रस्त्याची दुरूस्ती करण्यात आली आहे. टेमपाले येथील उड्डाणपूल लहान वाहनांसाठी तात्पुरता खुला करण्यात आला आहे.

### वाहतूक नियमनासाठी ड्रोनची मदत

कोलाड, इंदापूर, माणगाव, लोणेरे या पट्ट्यात वाहतूक नियमनासाठी ड्रोन कॅमेऱ्यांची मदत घेतली जाणार आहे. या ड्रोन्सवर पोलिसांना वाहनचालकांना सूचना करण्याची निर्देश देण्याची सुविधा असणार आहे, ज्याद्वारे वाहतूक नियम मोडणाऱ्या वाहनचालकांना ड्रोनमधून उद्‌घोषणा करण्याचे निर्देश देऊ शकणार आहोत, अशी माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.

वडखळ ते नागोठणे या मार्गावरील एका मार्गिकेच्या काँक्रीटीकरणाचे काम जवळपास पूर्ण झाले आहे. उर्वरित ठिकाणी रस्ता सुस्थितीत आणला जात आहे. कशेडी घाटातील दुसरा बोगदाही तात्पुरत्या स्वरूपात खुला करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. त्यामुळे वाहनचालकांना मोठा दिलासा मिळेल.

माणगाव आणि इंदापूर येथील बाह्यवळण रस्त्यांची कामे रखडली आहेत. त्यामुळे या ठिकाणी वाहतूक कोंडी उद्‌भवते. या टप्प्यातील वाहतूक सुरळीत रहावी यासाठी माणगाव आणि इंदापूर येथील एसटी बसस्थानके गणेशोत्सव काळासाठी शहराबाहेर स्थलांतरीत करण्यात आली आहे. त्यामुळे एसटी बसेसच्या वाहतुकीमुळे होणारी अडचण निकाली निघणार आहे. मुंबईतून पाच हजार बसेस उद्यापासून कोकणात जायला निघणार आहेत. या बसेसचे आरक्षण पूर्ण झाले आहे. सर्वाधिक अडीच हजार बसेस ५ तारखेला कोकणात मार्गस्थ होणार आहेत. या पार्श्वभूमीवर महामार्गावर वाहतूक सुरळीत राहण्याच्या दृष्टीने जादा पोलीस बंदोबस्त तैनात केला जाणार आहे. **(पान २ वर..)**

# रायगडकरांची पाणी चिंता मिटली!

## २८पैकी २४ धरणे १०० टक्के भरली

**रोहे : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात समाधानकारक पाऊस पडला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील २८ धरणक्षेत्रात सध्या सरासरी ९९ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. २८पैकी २४ धरणे १०० टक्के भरली असून उर्वरित चार धरणे पूर्ण भरण्याच्या मार्गावर असल्याचे दिसून येते.

मुरूड तालुक्यातील फणसाड, तळा तालुक्यातील वावा, रोहा तालुक्यातील सुतारवाडी, पेण तालुक्यातील आंबेघर, सुधागड तालुक्यातील कोंडगाव, घोटवडे, ढोकशेत, कवेळे, उन्हेरे, श्रीवर्धन तालुक्यातील कुडकी, म्हसळा तालुक्यातील पाभरे, संदेरी, महाड तालुक्यातील वरंध, खिंडवाडी, कोथुर्डे, खैरे, खालापूर तालुक्यातील भिलवले, कलोते-मोकाशी, डोणवत, पनवेल तालुक्यातील मोरबे धरणक्षेत्रात १०० टक्के पाणीसाठा उपलब्ध असून पाण्याचा विसर्ग सुरू आहे. कर्जत तालुक्यातील साळोख, अवसरे, पनवेल तालुक्यातील बामणोली व उसरण धरणक्षेत्रात १०० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे, मात्र विसर्ग सुरू नाही.





उरण तालुक्यातील पुनाडे धरणक्षेत्रात ९३ टक्के, अलिबाग तालुक्यातील श्रीगाव ९९ टक्के, श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले ९८ टक्के आणि रानिवली धरणक्षेत्रात ९२ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. सध्या सुरू असलेला पाऊस असाच पुढे पडल्यास उर्वरित धरणेही पूर्ण क्षमतेने भरून जातील.

## विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावर आता आज सुनावणी

**पनवेल : प्रतिनिधी**

५१२.५० कोटी रुपयांच्या कर्नाळा नागरी सहकारी बँक घोटाळाप्रकरणी शेकापचे माजी आमदार आणि बँकेचे अध्यक्ष विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावर मंगळवारी (दि. ३) पनवेल जिल्हा न्यायालयात सुनावणी होऊ शकली नाही. आता ४ सप्टेंबर रोजी पुढील सुनावणी होईल.

कर्नाळा बँक घोटाळा प्रकरण

कर्नाळा बँकेत केलेल्या घोटाळाप्रकरणी विवेक पाटील, बँकेच्या संचालक मंडळातील २२ सदस्य आणि इतर अशा एकूण ८३ जणांवर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. या प्रकरणी विवेक पाटील, बँकेच्या सीईओ अपर्णा वडके, हेमंत सुताने, संचालक भालचंद्र रामभाऊ तांबोळी, डॉ. अरिफ युसुफ दाखवे यांना अटक करण्यात आलेली असून त्यांचा मुक्काम तळोजा जेलमध्ये आहेत. यापैकी विवेक पाटलांसह अटकेत असलेले बँकेचे संचालक भालचंद्र रामभाऊ तांबोळी आणि डॉ. अरिफ युसुफ दाखवे यांनी आपला जामीन अर्ज मागे घेतला आहे. विवेक पाटीलांच्या जामीन अर्जावर न्यायालयात सध्या वकिलांचा युक्तिवाद सुरू आहे.

# रायगड जि.प.तर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत देण्यात येणारे जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील प्राप्त प्रस्तावांमधून समितीमार्फत मूल्यांकन करून प्रत्येक तालुक्यातून एका शिक्षकाची निवड आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी करण्यात आली आहे तसेच दिव्यांग प्रवर्गातून एका शिक्षकाची विशेष पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड आणि प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनिता गुरव यांनी दिली.

### गणेशोत्सवानंतर होणार वितरण

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचा ५ सप्टेंबर हा जन्म दिवस दरवर्षी शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांना त्यांच्या चांगल्या कामगिरीसाठी आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. जिल्ह्यातून २०२४-२५च्या पुरस्कारांसाठी प्रस्ताव मागविण्यात आले होते. प्राप्त प्रस्तावांमधून प्रत्येक तालुक्यातून एका शिक्षकाची निवड आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी करण्यात आली आहे.

अलिबाग तालुक्यातील अजित हरवडे यांची जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली असून पेणमधील भास्कर पाटील, पनवेलचे जयदास घरत, कर्जतमधील भगवान घरत, खालापुरातील राजेंद्र फुलावरे, उरण येथील सुचिता जोशी, सुधागडातील जनार्दन भिलारे, रोह्यातील लीना सुर्वे, महाडमधील श्रद्धा मांडवकर, श्रीवर्धनचे प्रशांत वाणी, म्हसळ्यातील रमेश जाधव, पोलादपूरचे चंद्रकांत उतेकर, माणगावच्या अपूर्वा जंगम, तळा येथील अमिष भौड आणि मुरूड तालुक्यातील देवानंद गोगार यांना जिल्हा आदर्श पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे, तर पेण तालुक्यातील महेश पाटील यांना दिव्यांग श्रेणीतून विशेष शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण गणेशोत्सवानंतर होणार आहे.

# राज्यात जलविद्युत ऊर्जा निर्मिती प्रकल्पासाठी सात कंपन्यांमध्ये करार

## सामंजस्य करारामुळे अर्थव्यवस्था वाढीला गती –उपमुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

जलविद्युत ऊर्जा निर्मितीसाठीच्या पंम्प्ड स्टोरेज प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासन आणि विविध सात ऊर्जा कंपन्यांमध्ये सामंजस्य करार करण्यात आला. यामुळे ४० हजार ८७० मेगाव्हॅट ऊर्जानिर्मिती होणार असून, राज्यात दोन लाख १४ हजार कोटींची गुंतवणूक आणि ७२ हजारांहून अधिक रोजगार निर्मिती होणार आहे. राज्याची अर्थव्यवस्था तीन ट्रिलीयन करण्याच्या उद्देशास या करारामुळे गती मिळणार असल्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.




सह्याद्री अतिथीगृह येथे मंगळवारी (दि.३) महाराष्ट्र शासन आणि एनटीपीसी, वेलस्पन न्यू एनर्जी, एनएचपीसी, रीन्यू हायड्रो पावर, टीएचडीसी इंडिया, टोरंट पॉवर, अदानी ग्रीन एनर्जी यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शासकीय अधिकारी आणि खासगी कंपन्यांचे प्रतिनिधी यांचे अभिनंदन केले.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नैसर्गिक संसाधनांचा वापर करून ऊर्जा शाश्वत पद्धतीने निर्माण करू शकतो. राज्यात पश्चिम घाटात विशेष जैवविविधता आहे. तेथे अनेक ठिकाणी शीतगृहांसाठी ऊर्जेचा वापर होणार आहे. शासकीय आणि खासगी क्षेत्राने उत्सुकतेने हे करार पूर्णत्वास नेण्यास सहकार्य केले आहे. यामुळे राज्यासाठी शाश्वत वीजनिर्मिती आणि अर्थव्यवस्था वाढीस सहकार्य लाभणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

डॉ. दीपक कपूर यांनी विविध सात कंपन्यांतर्गत होणाऱ्या करारासंदर्भात अधिक माहिती दिली. नॅशनल थर्मल पॉवर कंपनी अंतर्गत ९०७८ कोटी इतकी गुंतवणूक होणार आहे, तर १४०० रोजगार निर्मिती, एक हजार ८०० मेगाव्हॅट वीजनिर्मिती होणार आहे. वेल्सपन न्यु एनर्जी कंपनी अंतर्गत पाच हजार कोटी गुंतवणूक तर १५०० रोजगार निर्मिती, एक हजार २०० मेगाव्हॅट वीज निर्मिती होणार आहे. एनएचपीसी लि. अंतर्गत ४४ हजार १०० कोटी गुंतवणूक, सात हजार ३५० रोजगार निर्मिती आणि सात हजार ३५० मेगाव्हॅट वीज निर्मिती होणार आहे. रिन्यु हायड्रो पावर लि. अंतर्गत १३ हजार १०० कोटी गुंतवणूक, पाच हजार रोजगार निर्मिती, दोन हजार ६०० मेगाव्हॅट वीज निर्मिती होणार आहे.

टेहेरी हायड्रो डेव्हलपमेंट कार्पोरेशन इंडिया लि. अंतर्गत ३३ हजार ६२२ कोटी गुंतवणूक, सहा हजार ३०० रोजगार निर्मिती तर सहा हजार ७९० मेगाव्हॅट वीजनिर्मिती होणार आहे. टोरंट पावर लि. अंतर्गत २८ हजार कोटी गुंतवणूक १३ हजार ५०० रोजगार निर्मिती, पाच हजार ६०० मेगावॅट वीज निर्मिती होणार आहे. अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड अंतर्गत ५४ हजार ४५० कोटी इतकी गुंतवणूक, ३० हजार रोजगार आणि नऊ हजार ९०० मेगाव्हॅट इतकी वीज निर्मिती केली जाणार असल्याची माहिती अप्पर मुख्य सचिव डॉ. कपूर यांनी दिली.

# ई–गव्हर्नन्समुळे कमी वेळेत रक्कम थेट खात्यात जमा –मुख्यमंत्री शिंदे

**मुंबई : प्रतिनिधी**

ई–गव्हर्नन्स हे फक्त तंत्रज्ञान नसून लोकांची विचार प्रवृत्ती बदलण्याचे माध्यम आहे. यामुळे पारदर्शकता येत असून सामान्य नागरिकांमध्ये प्रशासनाबाबत विश्वास निर्माण होतो. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेच्या पहिल्या दोन हप्त्याची रक्कम कमी वेळेत थेट लाभार्थ्यांच्या खात्यात केवळ ई–गव्हर्नन्समुळे शक्य झाल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

ई–गव्हर्नन्सविषयक २७व्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन मुंबई येथे करण्यात आले. विकसित भारत: सुरक्षित आणि शाश्वत ई–सेवा वितरण अशी संकल्पना असलेल्या या दोन दिवसीय परिषदेचा शुभारंभ मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला.

या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, मुख्य सचिव सुजाता सौनिक, केंद्रीय सचिव व्ही. श्रीनिवास, केंद्रीय सचिव एस.कृष्णन, केंद्रीय अतिरिक्त सचिव पुनीत यादव, माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन नैनुटिया, धोरणकर्ते, पुरस्कार विजेते, देशभरातील प्रतिनिधी, विविध राज्यातील शासकीय अधिकारी, तज्ज्ञ उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, महाराष्ट्रात घराची खरेदी–विक्री संदर्भातील मालमत्तेची नोंदणी ही कोणत्याही उपनिबंधक कार्यालयात करणे शक्य झाले आहे. सुशासनबाबत बोलताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या किमान सरकार, कमाल प्रशासन या वाक्याची आठवण होते. भविष्यात मालमत्ता खरेदी–विक्री ही ऑनलाईन करण्याची प्रक्रिया सुरू आहे. आता मुख्यमंत्री सचिवालयात ई–ऑफिसद्वारे संपूर्ण फायलिंगचे काम होते. भविष्यात मंत्रालयातील कामे ई–ऑफीसद्वारे होणार आहेत. राज्यात सेवा अधिकारांतर्गत सर्व सेवा ऑनलाईन पुरविण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

या वेळी मुख्यमंत्र्याच्या हस्ते कळ दाबून सामान्य प्रशासन विभागाच्या प्रशासकीय सुधारणा, रचना व कार्यपद्धती याचे नाव बदलण्यात आले असून ते आता नाव प्रशासकीय नावीन्यता, उत्कृष्टता आणि सुशासन असे करण्यात आले.




# रायगडात एसटी संपाला संमिश्र प्रतिसाद

**अलिबाग : प्रतिनिधी**

एसटी कर्मचारी संघटनांच्या संयुक्त कृती समितीने पुकारलेल्या आंदोलनाला रायगड जिल्ह्यात संमिश्र प्रतिसाद मिळत आहे.

रायगड विभागातील आठही आगारांमध्ये बहुतांश कर्मचारी कामावर हजर आहेत. सर्वच आगारातून सकाळपासूनच्या नियमित फेऱ्या सुरू आहेत.

मागील वेळी झालेल्या दीर्घकालीन संपाचा कर्मचाऱ्यांना फटका बसला होता. त्यामुळे संपात सहभागी होण्याबाबत कर्मचारी वर्गात संभ्रम असल्याचे दिसून येते.

काही मोजकेच कर्मचारी संपात सहभागी झाले. महाड, माणगाव, रोहा आगारातील काही फेऱ्या रद्द करण्यात आल्या, तर अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन, पेण, कर्जत आगारातून पूर्ण वाहतूक सुरू असल्याची माहिती एसटी विभागाकडून देण्यात आली.

**काही फेऱ्या रद्द कराव्या लागल्या असल्या तरी आजच्या संपाचा प्रवासी वाहतुकीवर फारसा परिणाम झाल्याचे दिसून येत नाही. गणेशोत्सव तोंडावर असल्याने आम्ही संपकरी कर्मचाऱ्यांची समजूत काढून त्यांना संपापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करीत आहोत. सध्या उपलब्ध कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून जास्तीत जास्त सेवा देत आहोत.**

**–दीपक घोडे, विभाग नियंत्रक, रायगड**

# गणेशभक्तांच्या सुखकर प्रवासासाठी प्रशासन सज्ज

## महामार्गावर सुविधा केंद्रांची उभारणी; रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

**रायगड : प्रतिनिधी**

कोकणात येणाऱ्या गणेशभक्तांचा प्रवास अधिक सुखकर आणि सोपा व्हावा, यासाठी त्यांना आवश्यक सर्व सुविधा महामार्गावर सहज उपलब्ध व्हाव्यात यासाठी रायगड जिल्हा प्रशासनाने मोठी तयारी केली आहे.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी मंगळवारी (दि.३) मुंबई–गोवा महामार्गाची प्रत्यक्ष पाहणी करून उभारण्यात आलेल्या सुविधा केंद्रात देण्यात आलेल्या सुविधांचा आढावा घेतला.

गणेशोत्सव ७ सप्टेंबरपासून सुरू होत आहे. मुंबई, ठाणे, पालघर, नवी मुंबई आदी ठिकाणाहून गणेशोत्सवाकरीता गणेशभक्त कोकणात आपल्या गावी मुंबई–गोवा महामार्गावरून प्रवास करतात. रायगड जिल्हा पोलीस दलाकडून महामार्गावर पोलीस अधिकारी व कर्मचारी अशा स्वरूपाचा बंदोबस्त तैनात केला जाणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने जिल्ह्यात १० ठिकाणी सुविधा केंद्र उभारण्यात येत आहेत.



खारपाडा, खारपाले, वाकण, कोलाड, इंदापूर, माणगाव, लोणारे, महाड शहर, महाड टोलफाटा, पोलादपूर येथे ही सुविधा केंद्र असणार आहेत, तसेच या सुविधा केंद्रावर पोलीस मदत केंद्र, आपत्कालीन पोलीस मदत टोईंग व्हॅन, क्रेन, वाहन दुरूस्ती कक्ष, आपत्कालीन वाहन दुरुस्ती व टायरमध्ये हवा भरण्याची सुविधा असणार आहे.

वैद्यकीय कक्ष, ॲम्ब्युलन्स सेवा, मोफत आपत्कालीन वैद्यकीय उपचार सुविधा, बालक आहार कक्ष व मोफत चहा, बिस्कीट, सरबत, पाणी, ओआरएस आणि महिलांसाठी फिडींग कक्ष उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. प्रत्येक सुविधा केंद्रावर पोलीस समन्वयकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

गर्दी नियंत्रण, वाहतूक व्यवस्थापन आणि सामान्य जनतेच्या सुरक्षेसाठी पोलीस अधिकारी व अंमलदारांचे विशेष पथक तैनात करण्यात येणार आहे.

# माथेरानमध्ये ९४ दिवसांत पाच हजार मिमी पर्जन्यवृष्टी

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमध्ये तीन महिन्यांत तब्बल पाच हजार मिमी पाऊस बरसला असून तशी नोंदही झाली आहे. माथेरानमध्ये मंगळवारी (दि.३)पर्यंत ५०१८ मिमी पावसाची नोंद झाली असून सर्व धरणे तुडुंब भरली आहेत.

माथेरान टापू आणि परिसरात सुमारे ७०० हेक्टरमध्ये घनदाट जंगल असल्यामुळे येथे जोरदार पाऊस पडतो. यावर्षी देखील येथे चांगला पाऊस झाला आहे. माथेरानच्या डोंगर पायथ्याशी असलेली तिन्ही धरणे तुडुंब भरली आहेत. त्यामुळे मोठ्या शहराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे. २ सप्टेंबर २०२३मध्ये ४८१५ मिमी पावसाची नोंद आहे, तर यावर्षी २ सप्टेंबर २०२४पर्यंत ५०१८ मिमी पाऊस झाला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात पाऊस पडला असून पर्यटनातवृद्धी आल्याचे दिसून आले आहे.



तीन महिन्यांत तीन लाखांपेक्षा जास्त पर्यटकांनी माथेरानला भेट दिली आहे. पडणाऱ्या पावसामुळे पर्यटकांना मौजमजा करण्यास मिळत होती. सरींवरच्या पावसात भिजत धमाल करीत अनेक पर्यटक दिसले. शारलोट तलावावर धबधब्यावर अलोट गर्दी पहावयास मिळाली. यावर्षी जून महिन्यापासून पावसाळी पर्यटन बहरल्याचे दिसून आले.

# कोकण पेन्शन अदालत मंगळवारी

**नवी मुंबई** : कोकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत मंगळवारी (दि.१०) सकाळी ११ वा. कोकण भवनातील कक्ष क्र. १०६ सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय येथे आयोजित केली आहे.

पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास या दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित राहून पेन्शन विषयी आपले प्रश्न उपस्थित करावे, असे तहसीलदार (सामान्य प्रशासन) महेंद्र बेलदार यांनी कळविले आहे.

# विनय आपटे स्मृतिदिनानिमित्त लघुपट स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

सुप्रसिद्ध दिग्दर्शक, अभिनेते आणि निर्माते दिवंगत विनय आपटे यांच्या १०व्या स्मृतिदिनानिमित्त विनय आपटे प्रतिष्ठानतर्फे लघुचित्रपट (शॉर्टफिल्म) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.



यावर्षी शॉर्ट फिल्म्सना विषयाचे बंधन ठेवण्यात आलेले नाही. कुठल्याही विषयावर शॉर्ट फिल्म्स पाठवता येतील, मात्र ती जास्तीत जास्त २० मिनिटांची असावी. त्यासाठी २५ वर्षांखालील आणि २५ वर्षांवरील असे दोन वयोगट ठेवण्यात आले आहेत, तसेच शॉर्टफिल्म्स मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत पाठवता येतील. स्पर्धेत सादर होणाऱ्या सर्व शॉर्टफिल्म्स प्लॅनेट मराठी या ओटीटी चॅनेलवर दाखविण्यात येणार आहेत.

प्रत्येक स्पर्धकाला केवळ एकच प्रवेशिका पाठवता येईल. दोन्ही गटातील सर्वोत्कृष्ट विजेत्यांना रोख पारितोषिके देण्यात येतील. स्पर्धकांनी आपल्या प्रवेशिका vinayaptepratishthangmail.com या संकेतस्थळावर १५ नोव्हेंबरपर्यंत पाठवायच्या आहेत. प्रवेश मूल्य रु. ५०० आहे.

स्पर्धेतील दोन्ही गटात प्रत्येकी प्रथम क्रमांकाच्या शॉर्टफिल्मला १५,००० रु., द्वितीय क्रमांकाला १०,००० आणि तृतीय क्रमांकाला ७,५०० रु. अशी रोख पारितोषिके देण्यात येतील. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून सुप्रसिद्ध दिग्दर्शक पुरुशोत्तम बेर्डे, दिग्दर्शिका प्रतिमा कुलकर्णी, दिग्दर्शक आणि ज्येष्ठ संकलक राजन वाघधरे, जाहिरात तज्ज्ञ भरत दाभोळकर, ज्येष्ठ चित्रपट संकलक भक्ती मायाळू आणि सुप्रसिद्ध लेखिका आणि गीतकार रोहिणी निनावे हे आहेत. जास्तीत जास्त स्पर्धकांनी या लघुचित्रपट स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पान १ वरुन

## गणेशभक्त चाकरमान्यांचा प्रवास होणार सुखकर!

साडेतीनशे पोलीस अधिकारी व कर्मचारी, ७५ वाहतूक पोलीस आणि ५० गृहरक्षक दलाचे जवान महामार्गावर तैनात केले जाणार आहेत. याशिवाय राज्य राखीव दलाच्या दोन तुकड्या महामार्गावर तैनात ठेवण्यात येणार आहेत. महामार्गावर प्रवाशांच्या सोयीसाठी १० ठिकाणी प्रवासी सुविधा केंद्र उभारली जाणार आहेत. या ठिकाणी प्रवाशांसाठी मोफत चहा, नाश्ता, वैद्यकीय सुविधा, वाहन दुरूस्ती सुविधा आणि पोलीस मदत केंद्र उपलब्ध असणार आहे. महामार्गावरील अवजड वाहतुकीवर निर्बंध घालण्यात आले आहेत.

**मुंबईतून तळकोकणात जाण्यासाठी पर्यायी मार्ग**

मुंबई गोवा महामार्ग (मुंबई–नवी मुंबई–पनवेल–महाड), मुंबई–वाशी–पामबीच–उरण फाटा–खारपाडा–वडखळ–महाड, मुंबई–पुणे द्रुतगती मार्ग (मुंबई–खालापूर–पेण–महाड), मुंबई–पुणे द्रुतगती मार्ग (मुंबई–खालापूर–पाली–वाकण–माणगाव–महाड), मुंबई–पुणे द्रुतगती मार्ग (सातारा–उंब्रज–पाटण–चिपळूण), मुंबई–पुणे द्रुतगती मार्ग (सातारा–कराड–कोल्हापूर–राधानगरीमार्गे कणकवली), मुंबई–पुणे द्रुतगती मार्ग (सातारा–कराड– कोल्हापूर–आंबोलीमार्गे सावंतवाडी), मुंबईतून अटल सेतूमार्गे पळस्पे येथून मुंबई–गोवा महामार्ग.

# पर्यावरणपूरक घरगुती गणपती उत्सव स्पर्धेचे आयोजन

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील दाखणे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विश्वास उभारे प्रतिष्ठानतर्फे मर्यादित पर्यावरणपूरक घरगुती गणपती उत्सव स्पर्धा २०२४चे आयोजन ७ ते १२ सप्टेंबरदरम्यान करण्यात आली असल्याची माहिती प्रतिष्ठानचे संस्थापक विश्वास उभारे यांनी दिली.

स्पर्धेत प्रथम रोख ५००० रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय ४००० रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय ३००० रुपये प्रमाणपत्र व आकर्षक सन्मानचिन्ह, चतुर्थ २००० रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह तसेच उत्तेजनार्थ १० स्पर्धकांना प्रत्येकी १००० रुपये प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. श्रींची मूर्ती अडीच फुटांपेक्षा कमी असावी, पर्यावरणपूरक व नैसर्गिक वस्तूंचा वापर करून सजावट असावी, देखावा करताना देशभक्ती, सामाजिक व पर्यावरण विषय असावा, पहिल्या दिवशी संपूर्ण कुटुंबाचे एकत्रित फोटो व ३० सेकंदाची एक व्हिडीओ रिल बनवावी असे नियम सांगण्यात आले आहेत.

स्पर्धेत पंच कमिटीमार्फत गणपती देखाव्यांचे परीक्षण केले जाईल व विजेते निवडले जातील. सहभागी होण्यासाठी इच्छुक स्पर्धकांनी आपला उचित अर्ज भरून द्यावा. अर्ज मिळवण्यासाठी व स्पर्धेच्या अधिक माहितीकरिता प्रतिष्ठानचे अध्यक्ष सागर आवाद (८२९११९६७६५), कार्याध्यक्ष आकाश उभारे (७५०६७७७८०२), उपाध्यक्ष प्रकाश नाडकर (९२७२८१५१२९) यांच्याकडे संपर्क साधण्याचे आवाहन प्रतिष्ठानतर्फे करण्यात आले आहे.

# राज्यात पाच हजार किमी एक्स्प्रेस वे बांधण्याचा संकल्प –अनिलकुमार गायकवाड

**मुंबई : प्रतिनिधी**

येत्या दहा वर्षांत राज्यात पाच हजार किमी एक्सप्रेस वे बांधण्याचा संकल्प करण्यात आला आहे. राज्यातील प्रत्येक जिल्हा हा एक्स्प्रेस वेला कनेक्ट झाला पाहिजे, असे शासनाचे धोरण आहे. त्यामुळे १० वर्षांत हे सर्व जिल्हे कनेक्ट करून राज्याचा विकास साधता येईल, असा विश्वास राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष व कार्यकारी संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी व्यक्त केला.



पायाभूत प्रकल्पः चौफेर प्रगतीचा संकल्प या परिषदेचे उद्घाटन गायकवाड यांच्या हस्ते पार पडले. त्या वेळी ते बोलत होते. दै. शिवनेर व लाईफ रिटेल या संस्थांनी मुंबई सेंट्रल येथील हॉटेल साहीलमध्ये या परिषदेचे आयोजन केले होते. शिवनेरचे संपादक नरेंद्र वाबळे यांच्या हस्ते सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य डॉ. दिलीप पांढरपट्टे म्हणाले की, पायाभूत सुविधांमध्ये रस्त्यांबरोबरच आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, इंटरनेट या सुविधाही महत्त्वाच्या आहेत. इन्फ्रास्ट्रक्चमुळे माणसाच्या आयुष्यात बदल घडत असतो. माजी संचालक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय देवेंद्र भुजबळ यांनी, पायाभूत प्रकल्पांच्या उभारणीत अनेक अडचणी येत असतात. प्रकल्प उभा राहताना त्याचा लोकांचा कसा फायदा होणार आहे हे प्रारंभीच्या काळात लोकांना पटवून दिले पाहिजे. त्यासाठी मेळावे घेऊन लोकांशी संवाद साधला पाहिजे. माध्यमांचा जनसामान्यांवर परिणाम होत असतो. माध्यमांच्या माध्यमातून नागरिकांना विश्वासात घेऊन जनजागृती केली पाहिजे. त्यामुळे अशा परिषद घेतल्या पाहिजेत, असे मत त्यांनी व्यक्त केले.

या वेळी मुंबई मराठी पत्रकार संघाच्या विश्वस्त ज्येष्ठ पत्रकार राही भिडे, ज्येष्ठ पत्रकार अरुणकुमार मुंदडा, रमेश देशमुख, डॉ. खंडेलवाल आदी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## निवडक

### पनवेलमध्ये रोडरोमिओंवर कारवाई



**पनवेल :** शहरातील शाळा, कॉलेज परिसरात रोड रोमिओ तसेच दुचाकी व चारचाकी वाहनातून रॅश ड्रायव्हींग करणाऱ्यांविरुद्ध आता पनवेल शहर पोलिसांनी कारवाई करण्याची मोहीम सुरू केली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून शहरातील शाळा, कॉलेज परिसरात अशा रोडरोमिओंचा नाहक त्रास विद्यार्थिनींना होत होता. त्या संदर्भात अनेक तक्रारी पनवेल शहर पोलीस ठाणे तसेच वाहतूक पोलिसांकडे विविध सामाजिक संघटना व राजकीय पक्षाद्वारे करण्यात आल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत वपोनि नितीन ठाकरे यांनी या रोडरोमिओंविरोधात कारवाईचा बडगा उगारण्यास सुरूवात केली असून त्या अंतर्गत अशा प्रकारे रॅश ड्रायव्हींग करणाऱ्यांविरुद्ध मोटार ॲक्टप्रमाणे कारवाई करण्यात येणार आहे.

### माझ्या स्वप्नातील पनवेल निबंध स्पर्धा

**पनवेल :** गणेश कोळी संपादित पनवेल टाइम्सच्या वर्धापन दिनानिमित्ताने माझ्या स्वप्नातील पनवेल या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित केली आहे. माझ्या स्वप्नातील पनवेल ही स्पर्धा खुल्या गटासाठी आहे. शब्दमर्यादा १५००, निबंध लिखित स्वरूपात पाठवायचा आहे अथवा panveltimes@gmail.com या ई-मेल आयडीवर पाठवू शकता, प्रथम तीन विजेत्यांना पारितोषिके देण्यात येतील. निबंध पाठवण्याची अंतिम तारीख १० सप्टेंबरपर्यंत बी २०२ यशोकृष्णा अपार्टमेंट, शिवाजी रोड, पनवेल या पत्त्यावर पाठवावेत. अधिक माहितीसाठी गणेश कोळी (९३२२३३९७९७) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### अपघातात दोघांचा मृत्यू

**पनवेल :** दोन वेगवेगळ्या अपघातात दोघांचा मृत्यू झाल्याची घटना तळोजा एमआयडीसी व कळंबोली येथे घडली आहे. किशोर ठाकूर (वय ४०) हे नवीन पनवेल सेक्टर १८ येथे राहत असून ते आपल्या दुचाकीवरुन कामानिमित्त तळोजा एमआयडीसीत गेले होते. तेथून ते घरी परतत असताना सीईटीपी कंपनीसमोर त्यांच्या दुचाकीला पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रेलरने धडक दिली. यात ते गंभीररित्या जखमी होऊन मयत झाले आहेत. या अपघाताची नोंद तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. दुसऱ्या घटनेत देवद गावात राहणारे जंगबहाद्दूर शर्मा हे आपले काम संपवून दुचाकीवरून नवीन पनवेल येथे आपल्या घरी जात असताना कळंबोली येथील उड्डाण पुलाजवळ त्यांच्या गाडीला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने झालेल्या अपघातात ते गंभीररित्या जखमी होवून मयत झाले आहेत. या अपघाताची नोंद कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# पनवेल परिसरात फसवणूक, मारहाणीच्या घटनांमध्ये वाढ

## गाडीचा धक्का लागल्याने बसचालकाला मारले

**पनवेल : वार्ताहर**

व्हॅगनआर कारला विद्यार्थी घेऊन जाणाऱ्या बसचा धक्का लागल्याने कारमधील चालकाने शिवीगाळ करत लाकडी बांबूने बस चालकाला मारहाण केली. यात बस चालक जखमी झाला आहे. या प्रकरणी कारचालकाविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.




सुधीर मोरे हे कामोठे येथे राहत असून फोर्स कंपनीची बस (एमएच ०४ जीपी ०९४९) मध्ये कामोठे आणि पनवेल येथील मुलांना सेंट जोसेफ स्कूल न्यू पनवेल आणि दिबा पाटील स्कूल कामोठे शाळेत सोडण्यासाठी आणि ने-आण करण्याकरता ते वापरतात. सेंट जोसेफ नवीन पनवेल येथील विद्यार्थी बसमध्ये घेऊन त्यांना घराजवळ कामोठे परिसरात सोडण्यासाठी ते निघाले. बस विद्यार्थ्यांसह किया शोरूम जवळ सेक्टर १७, खांदा कॉलनी या ठिकाणी आले असता सफेद रंगाची व्हॅगन आर कारच्या चालकाने त्याच्या ताब्यातील कार उजव्या बाजूला घेतल्याने बसचा पुढील भाग त्याच्या कारच्या मागून घासला गेला. या वेळी कारचालक शिवीगाळ करत धमकी देऊ लागला व गाडीखाली उतरून सुधीर मोरे यांना गाडीच्या खाली ओढू लागला. वाहतूक कोंडी होऊ लागल्याने त्यांना कामोठे पोलीस ठाणे येथे जाऊ असे सांगितले.

बस चालक सेक्टर २२, कामोठे कडे जाण्यासाठी निघाले असता मोटर कार चालकाने पाठलाग केला आणि बस शिवनेरी सोसायटी, सेक्टर २२, कामोठे या ठिकाणी विद्यार्थिनीला सोडण्यासाठी थांबवले असता त्याने कार बसच्या समोर थांबवली आणि लाकडी बांबूने मारण्यासाठी गाडीच्या दिशेने धावत आला. सुधीर मोरे यांना गाडी बाहेर खेचून त्यांना लाकडी बांबूने मारहाण केली. यात सुधीर मोरे जखमी झाले. या वेळी मोरे यांची मुलगी मदतीसाठी धावून आली असता कारचालक तेथून पळून गेला.

जखमी सुधीर मोरे यांना रिक्षामध्ये बसून एमजीएम हॉस्पिटल येथे नेण्यात आले. व्हॅगनआर (एमएच ०४ एचएफ ८६६५) चालकाविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## व्यापाऱ्याला लूटले

**पनवेल :** पोलीस असल्याची बतावणी करून दोघा भामट्यांनी एका व्यावसायिकाकडील रोख रक्कम व सोन्याची चेन असा मिळून जवळपास दीड लाखांचा ऐवज लुबाडून नेल्याची घटना तळोजा परिसरात घडली.

सुंदर चौहान हे आपल्या दुचाकीवरून कल्याण येथून पनवेल बाजूकडे चालले असताना तळोजा परिसरात आल्यावर तेथील सिग्नलवर त्यांची गाडी थांबली असता दोन व्यक्ती मोटरसायकलवरून त्यांच्याजवळ आले व आपण पोलीस असल्याची त्यांनी बतावणी करून पुढे दरोडा पडल्याचे सांगून त्यांची तपासणी करण्याचा बहाणा करून त्यांना अंगावर दागिने घालून न जाण्याबाबत बजावले तसेच चौहान यांनी सोन्याची चेन काढून ठेवण्याचा प्रयत्न केला. त्या दोघांपैकी एकाने त्यांची सोन्याची चेन कागदात बांधून मोटरसायकलच्या डिक्कीमध्ये ठेवण्याचा बहाणा करून हातचलाखीने सोन्याची चेन व डिक्कीमध्ये ठेवलेले ५० हजार रुपये रोख रक्कम असा दीड लाखाचा ऐवज घेऊन त्यांनी पळ काढला आहे. याबाबतची तक्रार तळोजा पोलीस करण्यात आली आहे.

## 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांची विभागीय कॅरम स्पर्धेसाठी निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुका क्रीडा संकुल येथे झालेल्या कॅरम स्पर्धेमध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

यामध्ये द्वितीय क्रमांक पार्थ मनोज सकट (१२ वी वाणिज्य), तृतीय क्रमांक सिद्धांत प्रवीण साळवे (११ वी सायन्स), चतुर्थ क्रमांक कल्पेश संतोष मोरे (१२ वी सायन्स), पाचवा क्रमांक सुरज सुनील कुमार (११ वी सायन्स) या सर्व विद्यार्थ्यांची मुंबई विभागीय कॅरम स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

क्रीडा व युवक संचालनालय पुणे महाराष्ट्र राज्य आणि रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय व पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा सोमवारी (दि. २) आयोजित करण्यात आली होती.

याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस टी गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी त्याचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार

**पनवेल : वार्ताहर**

उरण येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांची भेट घेऊन त्यांनी नवीन कोर्ट इमारती वर मजले वाढविण्याकरिता शासनाच्या एचपीसीची मान्यता दिल्या बाबत ॲड. मनोज भुजबळ यांनी आभार मानले आहेत.



जुन्या कोर्ट इमारतीसाठीदेखील लवकरात लवकर मंजूरी देऊन योग्य ते सहकार्य मिळावे अशी विनंती करून त्याबाबतचे निवेदन यावेळी देण्यात आले आहे. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, ॲड. पारिजात पांडे, ॲड. दीपक गायकवाड यांच्यासह पनवेल बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड मनोज भुजबळ, ॲड. पि.जी.खोपकर, ॲड. भूषण म्हात्रे उपस्थित होते. या बाबत उपमुख्यमंत्र्यांनी सकारात्मकपणे लवकरात लवकर काम करू, असे आश्वासन दिले आहे.

## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात गीता पठण कार्यक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात गीता पठण या कार्यक्रम झाला.

या कार्यकमाच्या प्रमुख पाहुणे पदी समीर सचदेवा हे होते. गीता पठण केल्याने व्यक्तीच्या मनावर सकारात्मक परिणाम होतो. गीता पठणाव्द्वारे व्यक्तीला जीवनातील तत्वज्ञानाची उत्तम जाण येते. त्याच बरोबर कोणत्याही परिस्थितीमध्ये व्यक्तीला शांती आणि स्थिरता प्राप्त होण्यास मदत हाते. गीता पठणाने शारीरिक व मानसिक फायदे मिळतात हे समीर सचदेवा यांनी सांगितले. समीर सचदेवा हे मागील आठ वर्षांपासून कृष्ण भावनेचा अभ्यास करत असून ते आध्यात्मिक सल्लागार आणि मार्गदर्शक



म्हणून कार्यरत आहेत. या कार्यक्रमास प्राचार्या निशा नायर यांचे मार्गदर्शन लाभले.

या कार्यक्रमाकरीता संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, बोर्ड ऑफ डायरेक्टर संजयभगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी यांनी शुभेच्छा दिल्या.

## खारघरच्या रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये पोस्टर मेकिंग स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मंगळवारी (दि. ३) महिला समानता दिनानिमित्त स्टाफ वेल्फेअर समिती व वुमेन डेव्हलपमेंट सेल यांच्या संयुक्त विद्यमाने पोस्टर मेकिंग स्पर्धेचे आयोजन केले होते.

या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना महिला समानता हा विषय पोस्टर मेकिंग कॉम्पिटिशन साठी दिला होता त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी त्यांच्या वेगवेगळ्या कल्पना वापरून भीतीपत्रिका बनवून सादर केल्या. या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. मनोज यादव यांनी कामकाज पाहिले. या स्पर्धेचा निकाल ही जाहीर करण्यात आला त्यामध्ये प्रथम मेहेक माहिमकर द्वितीय अल्फिया शेख व तृतीय मनस्वी यांनी क्रमांक पटकाविले.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेचे आयोजन प्रा. रिजवाना मोमीन समन्वयक स्टाफ वेल्फेअर समिती व प्रा. सोनी पांडे समन्वयक वुमन डेव्हलपमेंट सेल यांनी केले तसेच प्रा. तनुजा सुमन, प्रा. डॉ. दीपिका हसीजा, प्रा. शितल चव्हाण, प्रा. पूजा लांजेकर, प्रा. प्रतीक्षा पाटील, प्रा. प्रथमेश उदेकर, प्रा. डॉ. नीलम लोहकरे, प्रा. शिवानी मानकामे तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.





**पनवेल : भाजपचे खारघर शहर मंडल सचिव दीपक ठाकूर आणि भाजप युवा मोर्चा खारघर शहर अध्यक्ष नितेश पाटील यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेवक निलेश बावीस्कर, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सरचिटणीस अक्षय लोखंडे, उपाध्यक्ष प्रवीण बेरा, सचिव आदित्य हातगे, अनिकेत पाटील, दृव गजरा, यश पवार, सुनिल कटके, आकाश भडांगे आदी उपस्थित होते.** (छाया : प्रफुल्ल कांबळे)

## पर्यावरणपूरक गणेशोत्सव परिसंवाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सरस्वती कॉलेज ऑफ इंजिनिअरींगमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव या विषयावरती परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. तसेच पर्यावरणपूरक गणेश उत्सवावर आधारित शॉर्ट फिल्म दाखविण्यात आली.

महापालिका कार्यक्षेत्रात पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला जास्तीत जास्त चालना देण्यासाठी मागील वर्षीप्रमाणे यंदाही माझी वसुंधरा ४.० अंतर्गत महापालिकेच्यावतीने आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली बाप्पा माझा पर्यावरणाचा राजा ही मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेंतर्गत हा परिसंवाद झाला.

महापालिकेच्या वतीने पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यावरती भर दिला जात आहे. याच्या अमंलबजावणीसाठी उपायुक्त डॉ. वैभव विधाते



यांच्या सूचनेनुसार सरस्वती कॉलेज ऑफ इंजिनिअरींगमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव या विषयावरती परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या परिसंवादामध्ये प्लास्टिकविरहीत उत्सव, प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीऐवजी शाडू किंवा लाल मातीच्या मुर्तीची पुजा तसेच पर्यावरणपूरक उत्सवाचे महत्व अशा विविध विषयांची माहिती देण्यात आली. तसेच यावेळी विद्यार्थ्यांनी सप्तसूत्रीची शपथ घेतली. तसेच पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे महत्व या विषयावर आधारित महापालिकेने तयार केलेली शॉर्ट फिल्मचे सादरीकरण करण्यात आले. या परिसंवादास एनएसएसचे सुमारे १०० विद्यार्थी उपस्थित होते. या विद्यार्थ्यांनी स्वयंप्रेरणेने खारघरच्या प्रत्येकी दोन सोसायट्यांमध्ये जाऊन पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याविषयी जनजागृती करणार असल्याचे पालिकेस सांगितले.

या कार्यक्रमास सरस्वती कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनीता पाल व संजय सिंह यांचे सहकार्य मिळाले.

## पनवेल येथे तीन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कर्नाटक संघ पनवेल येथे सुभाष कुडके लिखीत 'हुंदके वेदनेचे' नागनाथ डोलारे लिखीत 'निसर्गाचा साज' हे काव्यसंग्रह व शिवाजी मोटे यांचा गाव शिवारातील माणसं हा कथासंग्रह या तीन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा रविवारी (दि. १) झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ गझलकार ए.के.शेख होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक को.म.सा.प. पनवेल शाखा अध्यक्ष रोहिदास पोटे यांनी केले. नवनवीन साहित्यिक घडविण्यासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत असे ते आपल्या प्रास्ताविकात म्हणाले, तसेच त्यांनी वरील पुस्तकांचे तोंडभरून कौतुक केले. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून प्रमोद कर्नाड, जगदीश संसारे, डॉ. सुर्यकांत परकाले, को.म.सा.प. रायगड जिल्ह्या अध्यक्ष सुधीर शेठ, ज्येष्ठ साहित्यिका ॲड. सुनिता जोशी, पत्रकार अनिल भोळे व श्री. बनसोडे हे मान्यवर उपस्थित होते.



पुस्तक प्रकाशना नंतर तिन्ही लेखक व कवींचा सत्कार करण्यात आला. तिघांनीही आपल्या लिखाणातील भावना व्यक्त केल्या. आपण आपल्या साहित्यातून समाज मनाचे प्रतिबिंब मांडल्याचे सांगितले. प्रमुख वक्त्यांनी तिन्ही पुस्तकाविषयी आप आपले विचार व्यक्त केले. प्रा. संसारे म्हणाले 'हुंदके वेदनेचे 'या पुस्तकातील कविता या समाज जीवनाचा आरसा आहेत, प्रत्येक कविता मानवी मनाचे दर्शन घडवितात. कर्नाड यांनी निसर्गाचा साज हा कविता संग्रह म्हणजे नव्या पिढीला उत्साह देणारा आहे, निसर्गाच्या सान्निध्यात राहून आनंद घेणारा आहे.

खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर आर्ट्स कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. सुर्यकांत परकाळे यांनी गाव शिवारातील माणसं या कथा संग्रहाला अण्णा भाऊ साठे, वामन ओव्हाळ यांच्या कथेचा बाज आहे, गावरान गोडवा आहे, जुन्या चालीरीती या कथा संग्रहात पहायला मिळतात. पुढे जाऊन त्यांनी या साहित्यकृतीमध्ये विद्रोही भावना लेखकाची प्रकट झाले आहे निरीक्षण सुद्धा त्यांनी नोंदवले. मी लवकरच या पुस्तकाचे इंग्रजी अनुवाद करणार असे ते म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात ए.के. शेख यांनी तिन्ही पुस्तकांचा समीक्षात्मक लेखाजोखा मांडला व यापुढेही लिहीत रहा म्हणून भरभरून शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. माधुरी थळकर यांनी त्यांच्या गोड वाणीतून केले. शेवटी काशिनाथ जाधव यांनी आयोजकांचे व प्रमुख पाहुण्यांचे आभार मानले.

## संपादकीय

# संपाची वेळ चुकीची

**एसटी हे महाराष्ट्रातील गावागावातील सर्वसामान्य माणसाचे प्रवासाचे साधन आहे, परंतु तरीही गणेशोत्सव अगदी तीन-चार दिवसांवर आलेला असताना राज्य परिवहन (एसटी) कर्मचारी संघटनेने आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी मंगळवारपासून बेमुदत संपाची हाक दिली. यामुळे राज्यभरात काही ठिकाणी एसटीची सेवा विस्कळीत झालेली दिसली. औद्योगिक न्यायालयाने हा संप बेकायदा ठरवला असून मुख्यमंत्र्यांनी एसटी कर्मचाऱ्यांना सकारात्मक चर्चेचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे या प्रश्नी लवकर तोडगा निघेल अशी अपेक्षा आहे.**

एसटी कामगारांच्या संयुक्त कृती समितीने मंगळवारपासून बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा दिला. त्यानुसार राज्यातील काही आगारांमध्ये मंगळवारी कामबंद आंदोलन पुकारण्यात आले. राज्यभरातील अकरा कामगार संघटनांच्या प्रतिनिधींचा संयुक्त कृती समितीत समावेश आहे. मंगळवारी मुंबई आणि विदर्भात एसटीची वाहतूक सुरळीत होती तर मराठवाड्यातील लातूर आणि नांदेड विभागात बहुतेक आगार बंद राहिले. एकंदर राज्यभरात काही ठिकाणी कामबंदचा परिणाम दिसला तर काही ठिकाणी त्याचा अजिबात प्रभाव नव्हता. दरम्यान, एसटी कर्मचाऱ्यांचा हा संप औद्योगिक न्यायालयाने बेकायदा ठरवला असून सणासुदीच्या तोंडावर जनतेला अशातऱ्हेने वेठीस धरू नये, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. चर्चेतून सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासनही त्यांनी दिले आहे. तत्पूर्वी मंगळवारी सकाळपासूनच हे आंदोलन पुकारण्यात आल्याने सर्वसामान्य जनतेला मोठा फटका बसला. अनेक भागांत पाऊस सुरू असल्याने लोकांचे हाल झाले. शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटी कामगारांना वेतन द्यावे, कामगार कराराच्या तरतुदीनुसार २०२४ पर्यंतच्या वाढीव महागाई भत्त्याची, घरभाडे भत्त्याची तसेच वार्षिक वेतनवाढीची थकबाकी द्यावी. ज्येष्ठ कामगारांच्या मूळ वेतनात झालेल्या विसंगती दूर करत सर्वच कामगारांना सरसकट पाच हजार रूपये लागू करावेत आदी मागण्यांसाठी एसटी कर्मचाऱ्यांनी हे आंदोलन पुकारले आहे. वास्तवत: यापूर्वी सात ऑगस्टला मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी कर्मचाऱ्यांच्या संयुक्त कृती समितीच्या प्रतिनिधींसमवेत चर्चा केली होती. एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत सरकार सकारात्मक असल्याचे आश्वासनही या वेळी देण्यात आले. मागण्यांमुळे सरकारवर येणारा वित्तीय भार आणि त्यानुसार घालावयाची सांगड यासंदर्भात उच्च अधिकार समितीसोबत लवकरच बैठक घेऊन अहवाल सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले होते. त्यानंतर सरकारकडून प्रतिसाद मिळण्याच्या आतच एसटी कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचे हत्यार उपसले. गणेशोत्सवात नागरिक आपापल्या गावी जात असतात. बहुतेकांसाठी एसटीवाचून पर्याय नसतो. अशा प्रवाशांवर मंगळवारी एसटी स्थानकांत ताटकळत बसण्याची वेळ आली. नागपूर, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, कोल्हापूर, अकोला, नाशिक, धुळे आदी जिल्ह्यांमध्ये एसटी सेवा ठप्प झाली. तर अनेक आगारांमध्ये संपाचा कुठलाही परिणाम नव्हता. मुंबईत एसटी वाहतूक सुरळीत होती, तर कल्याण आणि विठ्ठलवाडीत आगार बंद राहिले. संपामुळे शाळकरी मुलांचेही हाल झाले. दरम्यान, बुधवारी राज्य सरकारने यासंदर्भात बैठकीचे आयोजन केले असून त्यात सकारात्मक चर्चा होईल असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे. गणेशोत्सवासाठी नागरिकांना खरेदी-विक्रीसाठी प्रवास करणे भाग पडते आहे. त्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांनी या काळात संप करू नये असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. एसटी कामगार हे प्रतिकूल परिस्थितीत काम करत असल्यामुळे त्यांच्या मागण्यांकडे सरकारही नेहमीच सहानुभूतीने पाहते. लवकरच याप्रश्नी सकारात्मक तोडगा निघेल अशी अपेक्षा आहे.

# महानुभव पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी



महानुभव पंथाचे संस्थापक, थोर समाजसुधारक आणि तत्त्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांची आज जयंती. महानुभाव धर्मीयांच्या श्रद्धेनुसार त्यांना ईश्वरांच्या पंचावतारांपैकी पाचवा अवतार मानले जाते. लीळाचरित्र या मराठीतील पहिल्या चरित्रग्रंथाचे ते नायक म्हणून इतिहासात त्यांना महत्त्वाचे स्थान आहे. वैदिक परंपरेला नाकारून सर्वांना मोक्षाचा समान अधिकार देणारे चक्रधर स्वामी हे महाराष्ट्रातील पहिले ज्ञात समाजसुधारक होत. चक्रधर स्वामींचा जन्म सन ११९४मध्ये भाद्रपद शुद्ध प्रतिपदेला झाला. चक्रधर स्वामींच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा घेतलेला थोडक्या आढावा...

चक्रधर स्वामी यांच्या प्रारंभिक जीवनासंबंधीची माहिती लीळाचरित्राच्या या ग्रंथाच्या एकांक या भागात पाहायला मिळते. बाराव्या शतकाच्या पूर्वार्धात गुजराथमधील भडोच येथे चक्रधर स्वामी यांचा जन्म झाला. त्यांचे वडील विशाळदेव हे भडोचचा राजा मल्लदेव याचे प्रधान होते. त्यांच्या आईचे नाव म्हाळईसा होते. चक्रधरांचे पाळण्यातील नाव हरपाळदेव असे होते.

युवा झाल्यावर हरपाळदेव यांचा विवाह कमळाईसा यांच्याबरोबर झाला. याच काळात त्यांनी युद्धांतही पराक्रम गाजवला. पुढे हरपाळदेवांना आजारी लोकांची सेवा करायचा छंद जडला. ते राजवाडा सोडून आजारी लोकांबरोबर वेळ घालवू लागले. कालांतराने त्यांची प्रकृती अचानक खालवली व त्यांचा मृत्यू झाला, परंतु सरणावर ठेवल्यावर हरपाळदेव जिवंत असल्याचे आढळून आले. महानुभावीयांच्या श्रद्धेनुसार यावेळी श्रीकृष्णाने त्यांच्या शरीरात प्रवेश करून अवतार धारण केला. महानुभावीयांच्या पंच अवतारातील तिसरा अवतार श्री चांगदेव यांचा त्याच सुमारास मृत्यू झाला होता. त्यामुळे त्याचा आत्मा चक्रधर स्वामी यांच्या शरीरात शिरल्याचा एक मतप्रवाह आहे.


सर्वस्वाचा त्याग करून भ्रमण करत असताना हरपाळदेव ऋद्धिपूर येथे आले. तिथे त्यांना विरक्त अवस्थेतील गोविंदप्रभू दिसले. गोविंदप्रभूंपासून हरपाळदेव यांना शक्ती प्राप्त झाल्या. गोविंदप्रभूंनी त्यांना चक्रधर असे नाव दिले. गोविंदप्रभूंपासून शक्ती मिळाल्यानंतर चक्रधरांची विरक्ती अधिकच वाढू लागली. लीळाचरित्राच्या एकांक या भागात त्यांच्या या काळातील भ्रमंतीचे वर्णन आहे. अहमदनगर जिल्यातील पाथर्डीपासून १८ किमी अंतरावर असलेल्या येळी या गावात चक्रधरस्वामींनी काही काळ घालवला. येळी येथे महानुभाव पंथीय मंदिर आहे. पुढे महाराष्ट्रभर एकट्यानेच त्यांनी भटकंती केली.

सिंहस्थ यात्रेनिमित्ताने ते त्र्यंबकेश्वरला जाण्यास निघाले. वाटेत पैठण येथे त्यांनी त्र्यंबकेश्वरास जाण्याचा बेत रद्द करून पैठण येथेच विधिवत संन्यासाची दीक्षा घेतली. यानंतरच्या काळात त्यांनी प्रकटपणे समाज व धर्मसुधारणेचे त्यांचे कार्य सुरू केले. एकाकी भ्रमणाच्या काळात चक्रधरांनी लोकजीवन प्रत्यक्ष पाहिले. त्या काळातील सामाजिक व धार्मिक परिस्थितीचे अवलोकन केले. त्यांच्या पुढील ज्ञानदानाच्या कार्याची पूर्वतयारीच या काळात झाली, असे सांगितले जाते. अशा या महात्म्याने ७ फेब्रुवारी १२७४ रोजी आपला देह ठेवला.

चक्रधर हे स्वरूपसुंदर होते. आपल्या व्यक्तिमत्त्वाने आणि मधुर वाणीने जनतेला आकृष्ट करण्याचे विलक्षण सामर्थ्य त्यांच्या ठिकाणी होते. गुजराती ही त्यांची मातृभाषा होती, तरी मराठीवरही त्यांचे उत्तम प्रभूत्व होते. संस्कृत भाषेचा व ग्रंथांचाही त्यांचा चांगला व्यासंग होता. जीव व देवता ह्या परमेश्वर नाहीत त्यांच्या उपासनेने तात्कालिक फळे मिळतात, पण आत्यंतिक मोक्ष मिळत नाही. दत्तात्रेय, कृष्ण, चक्रपाणी, गोविंदप्रभू व स्वतः आपण या ईश्वरावतार असलेल्या 'पंचकृष्णां'च्या भक्तीनेच तो मिळतो, हे त्यांच्या उपदेशाचे सार होय. ते अहिंसेचे पुरस्कर्ते होते. वर्णविषमता, विटाळचांडाळ इ. त्यांना मान्य नव्हते. त्यांच्या अनुयायांचा जो पंथ वा मार्ग निर्माण झाला, त्यालाच आज ऱ्महानुभाव पंथ असे म्हणतात. त्यांचे पट्टशिष्य नागदेवाचार्य यांनी त्यांच्यानंतर या पंथाचा प्रचार व प्रसार केला. चक्रधरांचे चरित्र लीळाचरित्र या आद्य मराठी ग्रंथात ऱ्हाइंभटाने संकलित केलेले आहे. त्यातून निवडलेली चक्रधरांची वचने व त्यांनी निरूपलेले दृष्टांत, केसोबासाने (केशवराज सूरी) सुत्रपाठ व दृष्टांतपाठ या ग्रंथांत संकलित केलेले आहेत. महानुभाव तत्त्वज्ञान व आचारधर्म यांचे हे आधारग्रंथ होते.

**(साभार : इंटरनेट)**

# विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ दादाभाई नौरोजी



दादाभाई नौरोजी हे पारशी विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ, कापूस-व्यापारी व भारतीय स्वातंत्र्यलढ्यातल्या राजकारण्यांच्या पहिल्या पिढीतील होते. आज त्यांचा जन्मदिन आहे. दादाभाई नौरोजी यांचा जन्म मुंबईत ४ सप्टेंबर १८२५ रोजी एका पुरोहित पारशी कुटुंबात झाला. एल्फिन्स्टन महाविद्यालयातील त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीचा परिणाम म्हणून, नौरोजींना क्लेअर शिष्यवृत्ती मिळाली. १८४५मध्ये पदवीनंतर लवकरच ते एल्फिन्स्टन येथे प्राध्यापक म्हणून नियुक्त झालेले पहिले भारतीय ठरले. स्त्री शिक्षणाच्या प्रसारासाठी आयोजित केलेल्या विशेष वर्गात त्यांनी शिकवले.

२७ जून १८५५ रोजी ते लंडनमध्ये स्थापन झालेल्या कामा अँड कंपनी या पहिल्या भारतीय कंपनीमध्ये भागीदार म्हणून व्यवसायात सामील होण्यासाठी लंडनला रवाना झाले. चार वर्षांनंतर त्यांनी स्वतःची कंपनी नौरोजी अँड कंपनी सुरू केली. नंतर ते युनिव्हर्सिटी कॉलेज लंडन येथे गुजरातीचे प्राध्यापक झाले.


१८६७ मध्ये त्यांनी लंडनमध्ये ईस्ट इंडिया असोसिएशनची स्थापना केली, जी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पूर्ववर्ती संघटनांपैकी एक होती, ज्याचा उद्देश ब्रिटिश लोकांसमोर भारतीय दृष्टिकोन ठेवण्याच्या उद्देशाने होता. १८७४ मध्ये त्यांची बडोद्याचा दिवाण म्हणून नियुक्ती करण्यात आली आणि एक वर्षानंतर, महाराज आणि रहिवासी यांच्यातील मतभेदांमुळे त्यांनी दिवाणपदाचा राजीनामा दिला. जुलै १८७५ मध्ये ते मुंबई महानगरपालिकेचे सदस्य म्हणून निवडून आले. १८७६मध्ये त्यांनी राजीनामा दिला आणि लंडनला रवाना झाला. १८८३मध्ये त्यांची जस्टिस ऑफ द पीस म्हणून नियुक्ती झाली, त्यांनी 'व्हॉइस ऑफ इंडिया' नावाचे वृत्तपत्र सुरू केले आणि मुंबई महानगरपालिकेत दुसऱ्यांदा निवडून आले. ऑगस्ट १८८५ मध्ये ते गव्हर्नर लॉर्ड रे यांच्या निमंत्रणावरून मुंबई विधान परिषदेत सामील झाले.

३१ जानेवारी १८८५ रोजी जेव्हा बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन अस्तित्वात आली तेव्हा त्यांची उपाध्यक्षपदी निवड झाली. परदेश प्रवासाने त्यांच्या चारित्र्यावर आणि व्यक्तिमत्त्वावर छाप सोडली. संसदीय लोकशाहीवर त्यांचा ठाम विश्वास होता. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाचे मूल्यमापन करण्याच्या त्यांच्या अग्रगण्य कार्यासाठी त्यांना भारतीय आर्थिक विचारांच्या इतिहासात ओळखले जाते. त्यांनी अनेक महत्त्वाच्या संस्थांची स्थापना केली आणि भारत आणि ब्रिटनमधील अनेक आघाडीच्या संस्था आणि संस्थांशी ते संबंधित होते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ते आघाडीचे समाजसुधारक होते. त्यांचा जातीच्या बंधनांवर विश्वास नव्हता आणि ते स्त्री-शिक्षणाचे प्रणेते आणि स्त्री-पुरुष समान कायद्यांचे समर्थक होते.

**दादाभाई नौरोजींवरील पुस्तके**

दादाभाई नौरोजी (चरित्र, गंगाधर गाडगीळ), दादाभाई नौरोजी : भारतीय राजकारणातील भीष्माचार्य (व्यक्तिचित्रण, निंबाजीराव पवार), नवरोजी ते नेहरू (गोविंद तळवलकर), भारताचा स्वातंत्र्य संघर्ष (बिपीनचंद्र).

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# बीएसएनएलने युजर्ससाठी आणले स्वस्त प्लॅन

जिओ, एअरटेल आणि व्ही या टेलिकॉम कंपन्यांनी आपल्या रिचार्ज प्लॅनच्या किंमतीत वाढ केली आहे. या टेलिकॉम कंपन्यांनी रिचार्जमध्ये जवळपास १५ टक्क्यांनी वाढ केली. यानंतर अनके युजर्स बीएसएनएलकडे (BSNL) वळत असल्याचा रिपोर्टमध्ये दावा करण्यात आला. कारण, बीएसएनएलचे रिचार्ज प्लॅन स्वस्त आहेत. यातच आता बीएसएनएलनेही ब्रॉडबँड सेवेत मोठी एंट्री केली आहे.




जिओ आणि एअरटेलला टक्कर देण्यासाठी बीएसएनएलने आपल्या प्लॅनच्या किंमतीत लक्षणीय घट केली आहे. बीएसएनएलने अलीकडेच आपली फायबर ब्रॉडबँड सेवा स्वस्त केली आहे. बीएसएनएलने २४९ रुपये, २९९ रुपये आणि ३२९ रुपयांच्या प्लॅनची किंमत लक्षणीयरीत्या कमी केली आहे. आज आम्ही तुम्हाला हीच माहिती देणार आहोत. हे तुम्हाला ते कसे वापरता येईल हे समजून घेणे अधिक सोपे करेल.

बीएसएनएल ब्रॉडबँड प्लॅन २४९ रुपयांपासून सुरू होतात. या सुरुवातीच्या प्लॅनमध्ये, आधी १० Mbps स्पीड दिला जात होता, पण आता तो २५ Mbps इतका वाढवला आहे. इतर दोन प्लॅन रुपये २९९ आणि ३२९ रुपये आहेत. या दोन्ही प्लॅनमध्ये तुम्हाला २५ Mbps चा स्पीड देण्यात येत आहे. तर याआधी या प्लॅनमध्ये १० Mbps आणि २० Mbps स्पीड देण्यात येत होता.

हे प्लॅन फेअर यूसेज पॉलिसी (FUP) सह येतात. २४९ रुपयांचा प्लॅन १० GB फेअर यूसेज पॉलिसी ऑफर करतो, तर २९९ रुपयांचा प्लान २० GB फेअर यूसेज पॉलिसी ऑफर करतो. फेअर यूसेज पॉलिसी मर्यादा गाठल्यानंतर स्पीड २ Mbps पर्यंत कमी होईल. ३२९ रुपयांचा प्लॅन १००० GB फेअर यूसेज पॉलिसीसह येतो. यानंतर स्पीड कमी होऊन ४ Mbps होईल.

जर तुम्ही बीएसएनएल नेटवर्कवर स्विच करण्याचा विचार करत असाल, तर सर्वात आधी तुम्हाला बीएसएनच्या नेटवर्कची उपलब्धता तपासली पाहिजे. जर बीएसएनएल नेटवर्क तुमच्या शहरात उपलब्ध असेल तर तुम्ही ते वापरू शकता. दरम्यान, बीएसएनएल नेटवर्क दिल्ली आणि आजूबाजूच्या भागात उपलब्ध आहे, परंतु असे अनेक क्षेत्र आहेत, जिथे बीएसएनएल नेटवर्क अद्याप उपलब्ध नाही. अशा स्थितीत खरेदी करण्यापूर्वी संपूर्ण माहिती घ्यावी.

# बॉलीवूड अभिनेते ऋषी कपूर



## निमित्त

चॉकलेटी हीरो म्हणून लोकप्रिय असलेले अभिनेते ऋषी कपूर यांचा आज जन्मदिन आहे. ऋषी कपूर २०१८ पासून ल्युकेमियाशी (ब्लड कॅन्सर) झुंज देत होते. उपचारांसाठी ते अमेरिकेला गेले होते. ११ महिने तिथे उपचार घेतल्यानंतर सप्टेंबर महिन्यात ते भारतात परतले होते, तेथून परतल्यानंतर एका मुलाखतीत त्यांनी पुन्हा अभिनय करायची इच्छा व्यक्त केली होती. मात्र त्यानंतर काही महिन्यांतच त्यांचे निधन झाले होते. ऋषी यांनी १९७३ ते २००० दरम्यान ९२ रोमँटिक चित्रपटांत काम केले, त्यापैकी ३६ चित्रपट सुपहिट ठरले होते. २००८ मध्ये त्यांनी फिल्मफेअर लाइफटाइम अचिव्हमेंट अवॉर्डने सन्मानित करण्यात आले होते. शोमॅन राज कपूर यांच्या लाडक्या लेकाला चिंटू या निक नेमने ओळखले जायचे.

ऋषी कपूर पहिल्यांदा मोठ्या पडद्यावर १९५५ मध्ये रिलीज झालेल्या 'श्री ४२०' या चित्रपटात दिसले होते. वयाच्या अवघ्या तिसऱ्या वर्षी ते पहिल्यांदा कॅमेऱ्यासमोर आले होते. 'प्यार हुआ इकरार हुआ...' या गाण्यात ऋषी आपल्या भावंडांसह काही सेकंद दिसले होते. पावसातले दृश्य होते आणि ऋषी सतत डोळे बंद करायचे. नर्गिस यांनी चॉकलेट देऊन त्यांना समजावले होते. त्यानंतर १९७० मध्ये त्यांनी 'मेरा नाम जोकर'मध्ये अभिनय केला होता. त्यासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. नायक म्हणून 'बॉबी' या पहिल्याच चित्रपटासाठी १९७४ मध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला होता.

आपल्या ५० वर्षांच्या फिल्मी करिअरमध्ये ऋषी यांनी सुमारे १२१ चित्रपटांमध्ये काम केले. वयाच्या तिसऱ्या वर्षी सुरू झालेला हा प्रवास ६७ व्या वर्षांपर्यंत सुरू राहिला. बालकलाकार, मुख्य नायक आणि चरित्र अभिनेता अशा भूमिका त्यांनी वठवल्या. १९७३ ते २००० या काळात ९२ चित्रपटांत त्यांनी रोमँटिक भूमिका वठवल्या. त्यापैकी ३६ चित्रपट सुपरहिट ठरले. 'कर्ज', 'दीवाना', 'चांदनी', 'सागर', 'अमर अकबर एंथनी', 'हम किसी से कम नहीं', 'प्रेम रोग', 'हिना' हे त्यांचे निवडक गाजलेले चित्रपट आहेत.

ऋषी कपूर यांनी १९८० मध्ये अभिनेत्री नीतू सिंग यांच्याशी लग्न केले. दोघांनी १९७३ - १९८० या काळात १२ चित्रपट केले. या जोडीला पसंती मिळाली. दोघांचे अनेक चित्रपट हिट राहिले. जहरीला इंसान (१९७४), जिंदा दिल (१९७५), दूसरा आदमी (१९७७), अनजाने में (१९७८), झूठा कहीं का (१९७९) आणि धन दौलत (१९८०), दो दूनी चार (२०१०), बेशरम (२०१३) हे चित्रपट मात्र फ्लॉप ठरले होते.

२००० नंतर ४५ पेक्षा जास्त चित्रपटांत ऋषी यांनी चरित्र भूमिका साकारल्या. जलवा (२००२), हम तुम (२००४), फना (२००६), नमस्ते लंदन (२००७), लव आज कल (२००९) आणि पटियाला हाउस (२०१०) यासह अनेक चित्रपटांमध्ये ते दिसले. 'दो दुनी चार' या चित्रपटासाठी त्यांना फिल्मफेअर बेस्ट क्रिटिक ॲक्टर अवॉर्ड मिळाला. २०१६ मध्ये 'कपूर अँड सन्स'साठी सर्वोत्कृष्ट सहायक अभिनेता, २००८ मध्ये त्यांना जीवनगौरव पुरस्कार मिळाला. त्यांचा 'द बॉडी' हा चित्रपट २०१९ मध्ये आला होता. याशिवाय 'डोण्ट स्टॉप ड्रीमिंग' (२००७) आणि 'सांभर सालसा' (२००८) या इंग्रजी चित्रपटांमध्येही ते झळकले. २०१८ मध्ये उमेश शुक्ला दिग्दर्शित कॉमेडी-ड्रामा फिल्म '१०२ नॉट आउट'मध्ये त्यांनी अमिताभ बच्चन यांच्यासोबत काम केले होते. तब्बल २७ वर्षांनंतर ही जोडी पडद्यावर एकत्र आली होती.

**ऋषी कपूर यांना मिळालेले पुरस्कार**

१९७० - राष्ट्रीय पुरस्कार (चाइल्ड), १९७४ - फिल्मफेअरचा सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार, २००८ - फिल्मफेअर जीवनगौरव, २००९ - रशियन सरकारकडून विशेष सन्मान, २०११ - फिल्मफेअरचा सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा क्रिटिक पुरस्कार, २०१६ - स्क्रीन जीवनगौरव, २०१७ - फिल्मफेअरचा सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा पुरस्कार.

**(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!

(छाया : सलीम शेख)




माणगाव : दोन दिवसांवर आलेल्या गणेशोत्सवाचे वेध लागले असून शहरात विविध साहित्याची दुकाने सजलेली दिसत आहेत.

## आरोग्य प्रहर

# नसांमधील कोलेस्ट्रॉल दूर करेल 'हा' ज्यूस

आजकाल चुकीच्या जीवनशैली अनेक आजार आपल्या मागे लागतात. अयोग्य आहारामुळे शरीरातील नसांमध्ये कोलेस्ट्रॉल वाढण्याचा धोकाही बळावतो. नसांमधील कोलेस्ट्रॉल कमी करायचं असेल तर एक ज्यूस तुमचं काम सोपं करणार आहे.



आजकाल धावपळीच्या जीवनात चुकीच्या आहाराचं सेवन मोठ्या प्रमाणात केलं जातं. या अनहेल्दी लाईफस्टाईलमुळे कोलेस्ट्रॉल वाढण्याचा धोका असतो. शरीरात वाईट आणि चांगलं अशा दोन प्रकारचं कोलेस्ट्रॉल असून वाईट कोलेस्ट्रॉल वाढल्यानंतर हृदयविकाराच्या झटक्याचा धोका वाढतो.

शरीरात कोलेस्ट्रॉल वाढू नये यासाठी चांगला आहार घेणं गरजेचं आहे, मात्र तुम्हाला माहितीये का, असा एक ज्यूस आहे तो तुमच्या नसांमध्ये जमलेलं वाईट कोलेस्ट्रॉल साफ करण्यात मगत करतं. शिवाय या ज्यूसच्या सेवनाने हृदयविकाराचा झटका येण्याचं प्रमाण देखील कमी होतं.

हा ज्यूस आवळा आणि गाजरचा आहे. मुळात आवळा आणि गाजर या दोन्ही गोष्टी आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात. आवळ्यामध्ये व्हिटॅमीन सीचं प्रमाण भरपूर असतं. जे कोलेस्ट्रॉलला कंट्रोल करण्यासाठी देखील फायदेशीर असतं. दुसरीकडे गाजरामध्ये बीटा कॅरोटीन असतं जे तुमच्या हृदयापर्यंत पोहोचणाऱ्या नसांना साफ ठेवतं.

हा ज्यूस तयार करण्यासाठी २ आवळे, २ गाजर, थोडसं पाणी आणि स्वादासाठी एक चमचा मध या साहित्याची गरज भासणार आहे. कृती- पहिल्यांदा आवळा आणि गाजर स्वच्छ धुवून घ्या. यानंतर आवळ्याचं ही काढून त्याचे छोट छोटे तुकडे करा. यासोबत गाजराचेही बारीक तुकडे करून घ्या. आता या दोन्ही गोष्टी मिक्सरमध्ये टाकून त्यात थोडं पाणी घाला. यानंतर ते चांगल्या पद्धतीने ब्लेंड करून त्याच मध टाका.

**कधी प्यावा हा ज्यूस?**

रोज सकाळी रिकाम्या पोटी हा ज्यूस प्यायल्याने वाईट कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत मिळू शकते. त्याचप्रमाणे हृदयाच्या आजारांचा धोकाही कमी होतो. आवळा आणि गाजराचा ज्यूस नैसर्गिकरित्या कोलेस्ट्रॉल कमी करतं. त्याचप्रमाणे हा ज्यूस शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकतो. हृदयाच्या आरोग्यासोबत तुमची रोगप्रतिकारक शक्तीदेखील मजबूत होण्यास मदत होते.

# खोपोली स्टेशन परिसरात विविध समस्या

## रेल्वे प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष; नागरिकांचा आरोप



**खोपोली : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेचे शेवटचे स्टेशन म्हणून खोपोली स्थानकाकडे पाहिले जाते, मात्र या स्थानकाकडे रेल्वे प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्याचा आरोप प्रवासीवर्गातून करण्यात येत आहे.

रायगड जिल्ह्यातील झपाट्याने विकसित होणाऱ्या शहरांमध्ये खोपोली शहराचे नाव अग्रस्थानी घेतले जाते. या ठिकाणी शाळा, महाविद्यालय, शासकीय कार्यालय, अनेक कारखाने असून यामध्ये बाहेरून येणाऱ्या कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागातील विद्यार्थी, कामासाठी येणारे ग्रामस्थ व शनिवार-रविवारीही मुंबई, पुण्याकडील पर्यटकांची संख्याही लक्षणीय असते. असे असतानाही या महत्त्वाच्या रेल्वे स्थानकाकडे प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्याचा आरोप खोपोलीतील नागरिकांमधून करण्यात येत आहे.

रेल्वे प्रशासनाची मोठ्या प्रमाणात मोकळी जागा असून त्या जागेचा प्रशासनाने योग्य तो वापर करावा, अशी मागणी प्रवासीवर्गातून करण्यात येत आहे. या मोकळ्या जागेत परिसरातील लोकांकडून कचरा टाकण्यात येत असून त्यामुळे दुर्गंधी पसरली आहे व आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. स्थानकाच्या बाजूने असणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी साचले असून यातून मार्ग काढताना प्रवाशांना कसरत करावी लागत आहे. रेल्वेचे अधिकारी कर्जत स्थानकापर्यंत येत असतात, मात्र खोपोलीकडे येण्यासाठी केव्हा वेळ मिळणार? अशीही प्रवाशांमध्ये चर्चा आहे. खासदार श्रीरंग बारणे यांनी खोपोली स्थानकाकडे भेट देऊन या भागातील समस्या सोडवाव्यात, अशी मागणी प्रवाशांतून होत आहे.

### भाजपकडून आंदोलनाचा इशारा

*आम्ही अलिकडेच या समस्यांबाबत रेल्वे स्थानकातील स्टेशनमास्तर यांना निवेदन देऊन ते निवेदन वरिष्ठांपर्यंत पोहचविण्याचे आवाहन केले आहे. प्रशासनाने याबाबत तातडीने लक्ष दिले नाही, तर वेळप्रसंगी आम्हाला आंदोलन करावे लागेल, असा इशारा दिल्याचे भारतीय जनता पक्षाच्या खोपोली शहर महिला आघाडीच्या अध्यक्ष अश्विनी अत्रे यांनी सांगितले.*

# रोहा तालुक्यात विजेचा लपंडाव, नागरिक हैराण

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील ग्रामीण भागात सातत्याने विजेचा लपंडाव सुरू आहे. त्यामुळे नागरिक हैराण झाले असून नागरिकांतून संताप व्यक्त केला जात आहे.

पावसाळ्यापूर्वी सातत्याने वीज मंडळाकडून सुट्टी घेऊन विजेचे काम करण्यात आले होते, परंतु यावर्षी सातत्याने गेली तीन महिने वीज खंडित होत असल्याचे दिसून येत असल्याने नेमके कोणते काम झाले? याबाबत प्रश्न निर्माण होत आहे. आता पाऊस कमी झाला आहे, परंतु वीज खंडित होण्याचे प्रमाण मात्र सातत्याने सुरूच आहे. छोटे व्यापारी दूध डेअरी, हॉटेल, लाँड्री, पिठाची गिरण, स्वीट मार्ट, सायबर कॅफे आदी विजेवर आधारित व्यवसायिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. गणेशोत्सवासाठी काही दिवस उरले आहेत. त्यामुळे त्याची तयारी शहरासह ग्रामीण भागात होताना दिसत आहे, परंतु वीज खंडित होत असल्याने त्याचा फटका बसताना दिसत आहे. गणेशोत्सवादरम्यान तरी वीजपुरवठा सुरळीत राहावा, अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.

नियमित वाचा 'रामप्रहर'

प्रोसेस जमा ता.

श्री. इर्शाद आर. शेख, पनवेल
अर्जदारांचे वकील

## जाहिर नोटीस

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात...**
**श्री. के.एम.सोनावणे साहेब यांच्या कोर्टात**

दि.चौ.अर्ज.क. १११९/२०२४
नि १४
ने.ता. ०८/१०/२०२४

१) श्री. रमाकांत काशिनाथ भगत,
वय ६९ वर्षे, धंदा - शेती,
२) श्री. धनंजय काशिनाथ भगत,
वय - ६१ वर्षे, धंदा - शेती दोघेही
रा. शेलघर, ता. पनवेल, जि. रायगड
} अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे असे कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी त्यांना कै. काशिनाथ त्रिंबक भगत यांचे दि. २८/०४/२०१६ रोजीचे अंतिम मृत्यूपत्राप्रमाणे मिळणा-या खालील वर्णनाच्या मिळकती संदर्भात अर्जदार यांनी सदरचे प्रोबेट दाखला मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. कै. काशिनाथ त्रिंबक भगत यांचे मालकीच्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे-

**अ) संपादनात समाविष्ट नसलेल्या मौजे गव्हाण, ता पनवेल, जि- रायगड येथील खालील वर्णनाच्या शेतजमिनी मिळकती आहेत.**

| अ.क्र. | भुमापन क्रमांक व हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १ | २५६/५/अ | ०-३०-४० पो.ख. ०-०४-६० एकूण ०-३५-०० | ४.८४ |
| २ | २५५/७ | ०-१०-५० पो.ख. ०-०१-२० एकूण ०-११-७० | १.६२ |
| ३ | २५५/४ | ०-०७-८० | १.०६ |
| ४ | २५१/३ | ०-०९-४० पो.ख. ०-००-२० एकूण ०-०९-६० | ०.५० |
| ५ | २५०/९ | ०-०५-०० | ०.३१ |
| ६ | २५०/८ | ०-०२-३० | ०.१२ |
| ७ | २५०/७ | ०-०२-८० पो.ख. ०-००-२० एकूण ०-०३-०० | ०.४२ |
| ८ | २५०/६ | ०-०७-०० | १.२५ |
| ९ | २२९/७ | ०-०४-१० पो.ख. ०-००-२० एकूण ०-०४-३० | ०.८७ |
| १० | २२९/२ | ०-०८-९० पो.ख. ०-०१-०० एकूण ०-०९-९० | १.६९ |
| ११ | २२९/८ | ०-०६-१० | १.२५ |
| १२ | २२८/४ | ०-६३-०० पो.ख. ०-०२-०० एकूण ०-६५-०० | १.८८ |

**ब) मौजे गव्हाण, ता पनवेल, जि रायगड येथील संपादनात समाविष्ट झालेल्या शेतजमिनी मिळकती आहेत. सदरील संपादीत मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | युनिट केस नं | सर्व्हे नं | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) |
|---|---|---|---|---|
| १ | २७७ | २२५ | ३ | ०-१२-०० |
| २ | | २२६ | १ | ०-३३-३० पो.ख. ०-००-६० एकूण ०-३३-९० |
| ३ | | २५२ | २ | ०-१४-०० |
| ४ | | २५२ | ९ | ०-०८-०० |
| ५ | ४८८ | २३० | १/१ | ०-१६-६० पो.ख. ०-०१-३० एकूण ०-१७-९० |
| ६ | ७४३ | २३१ | २ | ०-११-३० पो.ख. ०-०२-८० एकूण ०-१४-१० |

वर नमुद परिच्छेद कलम ३ ब) मधील मिळकतींचे संपादनापोटी १२. ५ टक्के योजने अंतर्गत संचिका कं. उलवे २९२ अन्वये मौजे-उलवे येथे उलवे-१जी नोड मध्ये संचिका कं. २९२ अन्वये भखंड कं. १५, सेक्टर १७, क्षेत्र ८५० चौ. मीटर, अशा वर्णनाचा भुखंड तसेच संपादीत मिळकतीपोटी मिळणारी वाढीव नुकसान भरपाई.

**क) मौजे-गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड येथे घर मिळकत कं. ३९७, क्षेत्र लांबी ३३ X रुंदी २२ चौ. फुट क्षेत्रफळाचे घर.**

**ड) मौजे-गव्हाण, ता. पनवेल, 'जि. रायगड येथे घर मिळकत कं. ३९८, क्षेत्र लांबी ३० X रुंदी २२ चौ. फुट क्षेत्रफळाचे घर.**

**इ) बँक ऑफ इंडिया, शाखा गव्हाण यांचेकडील खाते कं. १२४३४२७१००००७८० मध्ये फिक्स डिपॉझीट मध्ये असलेली रक्कम रु. २६,००,०००/-.**

वर अर्जदार हयांनी कै. काशिनाथ त्रिंबक भगत यांचे दि. २८/०४/२०१६ रोजीचे अंतिम मृत्यूपत्रांन्वये मिळणा-या स्थांवर व जंगम मिळकतीबाबत कोणतीही हरकत असल्यास व हया हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत हया मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधी मध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. कोर्ट श्री. रमाकांत काशिनाथ भगत वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै. काशिनाथ त्रिंबक भगत यांचे पश्चात प्रोबेट दाखला मिळण्यास पात्र आहेत, असे सिध्द झाल्यास त्यांना हे प्रोबेट दाखला मंजूर करेल.

आज दिनांक ०२/०९/२०२४ रोजी माझ्या सही निशी व न्यायालयाच्या शिक्क्या निशी दिली.

**सही/-**
**लिपिक**
**दिवाणी न्यायालय व स्तर पनवेल.**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्तर पनवेल.**

# 'महा राष्ट्रवादी व्हॉट्सॲप हेल्पलाईनच्या माध्यमातून योजनांचा लाभ घ्यावा'



**रोहे : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने शासनाच्या विविध योजनांची माहिती, समस्या आल्यास त्याचे थेट महा राष्ट्रवादी व्हॉट्सॲप हेल्पलाईन (९८६१७१७१७१)च्या माध्यमातून शासकीय योजनेचा लाभ घेण्यास मदत होईल, अशी माहिती राष्ट्रवादी प्रवक्ते ॲड. सायली दळवी-जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या वेळी माजी गटनेते महेंद्र गुजर, शहर अध्यक्ष अमित उकडे, शहर अध्यक्ष प्राजक्ता चव्हाण, मानसी दाते, सागर बोबड, आसावारी मोकल आदी उपस्थित होते.

ॲड. सायली दळवी-जाधव यांनी, उपमुख्यमंत्री अजित पवार व खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने शासनाच्या विविध योजनांची माहिती, समस्या आल्यास त्याचे थेट महा राष्ट्रवादी व्हॉट्सॲप हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे. महायुतीच्या सरकारने नागरिकांच्या हितासाठी असंख्य योजना आणल्या आहेत.

या योजना कागदावरच न राहता त्याचा जास्तीत जास्त लाभ नागरिकांपर्यंत पोहचवण्यासाठी या हेल्पलाईनची मदत होणार आहे. या हेल्पलाईनवर गाव, तालुका व जिल्हा ही माहिती भरल्यास तुम्हाला योजनांची माहिती मिळेल, असे शेवटी सांगितले.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटिसीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे महसूल दप्तरी वर्णन केलेली मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालकांकडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे योजिले आहे. सदरहू मिळकतीचे मालकी हक्क तपासणीकामी तसेच होणाऱ्या व्यवहारासंबधी ही जाहीर नोटीस प्रसिध्द करत आहे.

**मौजे भेरले, ता. पनवेल, जि. रायगड**

| मालकाचे नाव | स.नं. हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर.पॉ | आकार रु = पैसे Rs= Ps |
|---|---|---|---|
| १. संतोष सुदाम आगिवले<br>२ हरिष शेण्या आगिवले<br>३. लक्ष्मी शेण्या आगिवले<br>४. संतोष रघुनाथ दळवी<br>५. प्रतिभा प्रभाकर जुनघरे<br>६. अनिता नारायण पालकर | ९/१ | ०-९९.६० पो.ख. ०-१७-९०<br>एकूण क्षेत्र १-१७-५० | १९-१२ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान मक्ता, वहिवाट, ताबा देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकंनी कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड. अमोल पवार**
पत्ता : पहिला मजला, अश्वमेध, सेक्टर १२,
प्लॉट १२, नवीन पनवेल जि. रायगड ४१० २०६
मो. क्र. ९८३३७३७९२२

# जिल्हास्तरीय बेंच प्रेस स्पर्धेला खेळाडूंचा प्रतिसाद

## ७२ खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने येथील रॉयल गार्डन सभागृहात अजिंक्यपद बेंच प्रेस स्पर्धा आणि राज्यस्तरीय निवड चाचणी स्पर्धा २०२४-२५ आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत जिल्ह्यातील ७२ खेळाडूंची सुवर्णपदकासह राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. स्पर्धेचे सांघिक विजेतेपद जीव्हीआर वेटलिफ्टिंग कर्जत या गटाने पटकावले.

या वेळी पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडच्या वतीने राजिप माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांना सन्मानित करण्यात आले. या वेळी प्रदेश सरचिटणीस अशोक भोपतराव, जिल्हा उपाध्यक्ष एकनाथ धुळे, अशोक सावंत, जिल्हा सहसचिव प्रकाश पालकर, शहर कार्याध्यक्ष राजाभाऊ कोठारी, तालुका उपाध्यक्ष ॲड. स्वप्निल पालकर, तालुका महिलाध्यक्ष ॲड. रंजना धुळे, शहर युवती अध्यक्ष युक्ता भोपतराव, शहर युवक अध्यक्ष सोमनाथ पालकर, शहर अल्पसंख्यांक सेल अध्यक्ष अमीर मणियार, शहर कार्याध्यक्ष प्रणित गायकवाड, माजी नगरसेवक उमेश गायकवाड, माजी नागसेविका मधुरा चंदन, सई वारे, शहर कार्याध्यक्ष मनीषा ठोंबरे, अरुण पाटकर आदी उपस्थित होते.

स्पर्धेत १७०हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला होता. त्यापैकी जिल्ह्यातील ७२ खेळाडूंची सुवर्णपदकासह राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. ६० खेळाडूंनी रौप्यपदक जिंकले. निवड झालेल्या खेळाडूंमध्ये कर्जत तालुक्यातील ४० खेळाडूंचा समावेश आहे.



# 'लाडकी बहीण योजनेची नोंदणी सप्टेंबरमध्येही राहणार सुरू'

**रायगड : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण या योजनेसाठी राज्यातील पात्र महिलांना आता सप्टेंबर २०२४मध्येही नोंदणी करण्यास परवानगी देण्यात आली आहे, असा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. पात्र महिलांनी तत्काळ नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आणि त्यांच्या आरोग्य पोषणात सुधारणा करण्यासाठी आणि कुटुंबातील त्यांची निर्णय भूमिका मजबूत करण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. यापूर्वी ३१ ऑगस्टपर्यंत नोंदणी करण्यास मुदत देण्यात आली होती. आता ही नोंदणी सप्टेंबरमध्येही सुरू राहणार आहे, तरी अधिकाधिक महिलांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-विहीघर, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तिच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीवे वर्णन येणेप्रमाणे:

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे- विहीघर, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | भोगवटदाराचे | गट क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै |
|---|---|---|---|---|---|
| विहीघर | रमेश महादेव जाधव<br>प्रतिक चंद्रकांत पोखरकर<br>चेतन आत्माराम चौधरी<br>दिपीका अतुल झेंडे<br>दत्तात्रय दाजी होरगर | ११९ | २/५ | ०.१९.४०<br>०.०१.१०<br>०.२०.५० | २.३६ |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या नर येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दिनांक :- ०४/०९/२०२४**

**सही/-**
**ॲड. सुरेखा र.सागावकर**
पत्ता :- शॉप नं ०३,०४, श्री हरे कृष्णा को. ऑप. सोसायटी, प्लॉट नं. १२, प्लॉट नं. ५, सेक्टर- ५, नवीन पनवेल, ४१०२०६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, माझे अशिल आणि खाली वर्णन केलेल्या जमीन मिळकतींचे जमीन मालक / भोगवटदार यांचेमध्ये सदर जमीन मिळकतींचे खरेदी संदर्भात वाटाघाटीने बोलणी झाली आहेत. तरी सदर जमीन मिळकतींच्या स्वामित्वाचा तपास करणेकरीता म्हणून मी सदरची जाहीर नोटीस देत आहे. सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**सदर जमीन मिळकतींचे वर्णन**
**मौजे- कसळखंड, ता. पनवेल, जि. रायगड**

| मालक/ भोगवटदार | गट नं | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रु. पै |
|---|---|---|---|
| १) मधुसुदन काशिनाथ पाटील<br>२) भगवान काशिनाथ पाटील<br>३) द्रौपदी पांडूरंग पाटील<br>४) कमलाकर पांडूरंग पाटील<br>५) भानुदास पांडूरंग पाटील<br>६) यशवंत पांडूरंग पाटील<br>७) हर्षद लक्ष्मण ठाकूर<br>८) भारती लक्ष्मण ठाकुर<br>९) स्वाती लक्ष्मण ठाकूर | ७९ | ०-२४-०० पो.ख. ०-११-०० एकूण ०-३५-०० | ०.४७ |
| | १०० | ०-३६-०० पो.ख. ०-०५-०० एकूण ०-४१-०० | ०.९४ |

तरी वरील मिळकतींचे बाबतीत अथवा त्यांच्या कोणत्याही हिश्श्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, तारण, गहाण, दान, बक्षीस, मृत्यूपत्र, पोटगी, चार्ज, ॲटॅचमेंट, लीन, वारसा, ट्रस्ट किंवा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत, असे समजुन माझे अशिल सदर मिळकतींचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दिनांक :- ०३/०९/२०२४**

**सही/-**
**ॲड. एस के राणे**
ऑफिस नं. २ दुसरा मजला, निल अथर्व को ऑप हौं सोसा. दुर्गामाता मंदीरा समोर पनवेल-४१०२०६

# विवा कॉलेजतर्फे विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील विवा कॉलेजतर्फे विविध क्षेत्रातील २२ मान्यवरांना पुरस्कारांचे वितरण गुरुवारी (दि.५) शिक्षकदिनी करण्यात येणार असल्याची माहिती प्राचार्य विवेक ढेपे यांनी दिली.

यामध्ये ॲड.राजीव साबळे (राजकीय व शैक्षणिक), ज्ञानदेव पवार (राजकीय), राजेंद्र साळवी (प्रशासकीय), सुवर्णा जाधव (सामाजिक), अब्दुल वहाब मुखी (व्यावसायिक), अजित तारलेकर (राजकीय), रामचंद्र कापसे (शैक्षणिक), प्राचार्य हर्षल जोशी (शैक्षणिक), गणेश पाटील (शैक्षणिक), विजय खाडे (शैक्षणिक), रमेश मोसे (शैक्षणिक), एकनाथ पाटील (शैक्षणिक), विजयशेठ मेथा (सामाजिक), जुबेर अब्बासी (राजकीय), सलीम शेख (पत्रकारिता), विनया जाधव (शैक्षणिक), शंकर शिंदे (शैक्षणिक), अतुल जाधव (प्रशासकिय), सायराबानू चौगुले (शैक्षणिक), शुभम जाधव (क्रीडा), तुषार जाधव (व्यावसायिक), संजय शिंदे (निवेदक व समालोचक) यांचा समावेश आहे.

## कर्मवीर भाऊराव पाटील माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय, पिरकोन

पो. आवरे, ता. उरण, जि. रायगड पिन. ४१०२०६

**जाहीर नोटीस**

सर्व नोंदणीकृत बांधकाम ठेकेदार ग्रामस्थ यांस जाहीर निविदेद्वारे कळविण्यात येते की, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिरकोन, जि. रायगड यांजकडून सन २०२४/२५ अंतर्गत कामाचे खालील प्रमाणे कामांसाठी मोहरबंद निविदा मागविण्याचे ठरविले आहे.

| अ क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकी रक्कम | निविदा पाठविण्याची अंतिम तारीख | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | हॉलचे फॉल सिलिंग व इतर दुरुस्ती | २,६२,३६३/- | ११.०९.२०२४ | १० दिवस |

अटी व शर्ती:-
१. सदर कामाचे अंदाजपत्रक शाळेच्या कार्यालयात पहावयास मिळेल.
२. अंतिम तारखेस दि. ११.९.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजल्यानंतर आलेल्या निविदा घेतली जाणार नाही.
३. प्राप्त निविदा दि. १३.०९.२०२४ सकाळी ११.०० वाजता शाळेच्या कार्यालयात उपस्थितां प्राचार्य यांच्या हस्ते उघडण्यात येतील
४. सविस्तर अटी व शर्ती करिता शाळेच्या कार्यालयाकडे संपर्क करावा.
५. ठेकेदाराने जी.एस.टी. प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
६. कोणतीही १ अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार शाळेने राखून ठेवला आहे.
७. पॅन कार्ड प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

**सही/-**
**प्राचार्य**
**क.भा. पाटील माध्य.उच्च माध्य विद्यालय**
**पिरकोन, ता. उरण- जि.रायगड**

## निवडक

### विभागीय लोकशाही दिन

**नवी मुंबई :** कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन सोमवारी (दि. ९) सकाळी ११ वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह, १ ला मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. लोकशाही दिनाच्या बैठकीस सर्व विभागीय स्तरावरील प्रमुख अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनी उपस्थित असणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी विभागीय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक आहे, असे परिपत्रकाद्वारे उपायुक्त (सामान्य प्रशासन) कोकण भवन संजीव पलांडे यांनी कळविले आहे.

### गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



**उरण :** आवरे गावातील पुरातन शिवालयात पाचव्या श्रावणी सोमवारी प्रातःकाळी शालेय विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत शिव महाआरतीचा कार्यक्रम झाला. या वेळी विघ्नहर्ता क्रिकेट क्लब आवरे या संघाला महा आरतीचा मान मिळाला. या वेळी श्रावणी सोमवार आरती सामूहातर्फे आवरे गावातील रामचंद्र म्हात्रे विद्यालय तसेच जे.जे.ठाकूर इंग्रजी माध्यम शाळेतील एसएससी व एचएससीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव चिन्ह, सन्मानपत्र व गुलाबपुष्प देऊन शिवभक्तांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यासाठी सुयश क्लासेस व निगा फाऊंडेशनचे सौजन्य लाभले. शिव मंदिरात सकाळी मोठ्या संख्येने शिवभक्त महाआरतीसाठी उपस्थित होते.

### अंजुला राय यांना पुरस्कार



**नवी मुंबई :** जन राष्ट्रीय रेल्वे शू साइन वर्कर्स युनियनतर्फे कस्तुरबा महिला मंडळ हॉल, माटुंगा पश्चिम, मुंबई येथे राष्ट्रसंत श्री शिरोमणी रोहिदास महाराज पुरस्कार २०२४चे आयोजन करण्यात आले होते. नवी मुंबईतील श्री मा फाउंडेशनच्या अध्यक्षा वडाळा येथील सेंट जोसेफ हायस्कूलच्या शिक्षिका अंजुला राय यांना आंतरराष्ट्रीय विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष स्वामी अरुणानंद महाराज आणि आंतरराष्ट्रीय विश्व हिंदू यांच्या हस्ते आदर्श शिक्षा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

### जलतरणपटू तन्मय सुतारचा सत्कार



**नवी मुंबई :** कोपरखैरणे गावचा जलतरणपटू तन्मय महेंद्र सुतार याचा नवी मुंबई महापालिकेतर्फे विष्णुदास भावे सभागृहात आमदार गणेश नाईक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पालिकेच्या क्रीडा उपायुक्त अभिलाषा म्हात्रे, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव, धनराज वनमाळी यांच्या उपस्थितीत नवी मुंबई भूषण सन्मानचिन्ह आणि २० हजार रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला. तन्मयने १७ जानेवारी ते २३ फेब्रुवारी २०२० या कालावधीत पाच अरबी समुद्र खाड्या पोहण्याचा विक्रम करून नवी मुंबई व देशाचे नाव रोशन केले तसेच इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड, आशिया बुक ऑफ रेकॉर्ड केले आहेत. २९ फेब्रुवारी २०२४ रोजी जगातील खडतर अशी धरमतर ते गेट वे ऑफ इंडिया ही ३६ किमीची समुद्र खाडी नऊ तास ३६ मिनिटांत पोहून विक्रम केलेला आहे.

### आदित्य घरतने जिंकले ‘सुवर्ण’

**पनवेल :** उरणमधील आदित्य अनंत घरत याने मुंबईतील



चेंबूर येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. त्यामुळे हरियाणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची संधी आदित्यला मिळाली आहे. त्याचे कौतुक होत आहे. अनेकांनी आदित्यचे राज्यस्तरीय स्पर्धेतील यशाबद्दल कौतुक केले आणि राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# पनवेलमध्ये विनापरमिट रिक्षा वाढल्या

**खारघर : प्रतिनिधी**

पनवेल तालुक्यात बेशिस्त रिक्षाचालकांवर केलेल्या कारवाईमुळे मोठ्या प्रमाणात विनापरमिट रिक्षा वाढल्याचे दिसून आले आहे.



(संग्रहित छायाचित्र)

पनवेल आरटीओ आणि खारघर वाहतुक शाखेने नुकतेच राबविलेल्या संयुक्त मोहिमेत २३ रिक्षाचालकांवर कारवाई करीत लाखो रुपयांचा दंड वसूल केला. या रिक्षामध्ये काही विनापरमिट रिक्षादेखील प्रवासी वाहतुक करीत असल्याचे निष्पन्न झाले. मागील वर्षभरात आरटीओ मार्फत राबविलेल्या मोहिमेत शेकडो विनापरमीट रिक्षा जप्त करण्यात आल्या आहेत. यामुळे पनवेल तालुक्यात मोठ्या प्रमाणात विनापरमिट रिक्षा धावत असल्याचे सिद्ध होत आहे. स्क्रॅप केलेल्या रिक्षा पुन्हा रस्त्यावर उतरतात कशा? हा प्रश्न यामुळे निर्माण झाला आहे.

१२ ते १५ वर्षांहून अधिक वर्ष झालेल्या जुन्या वाहनांच्या धूरामुळे शहरात मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते. तालुक्यात ४० हजारांपेक्षा जास्त ऑटोरिक्षांना आरटीओ कार्यालयाचे परमिट आहे. अद्यापही परमिट वितरण आहे. यात पिंक रिक्षाचे परमिटदेखील वाटप होणार आहेत. त्यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात ऑटो रिक्षा धावत असताना स्क्रॅप केलेले रिक्षा रस्त्यावर बेकायदा प्रवासी वाहतूक करीत आहेत. अशा स्क्रॅप रिक्षा रस्त्यावर येतात यामागे कोणते घटक आहेत. हे आरटीओने शोधण्याची गरज आहे. हा प्रकार थांबला नाही तर प्रामाणिक परमिटधारक रिक्षाचालकांवर अन्याय होण्याची शक्यता आहे.

भविष्यात पनवेल शहराची व्याप्ती वाढणार असल्याने अशा बेकायदा परमिट रिक्षावर लगाम लावण्याची गरज आहे. जुन्या झालेल्या रिक्षांमुळे शहरात मोठ्या प्रमाणात धूर प्रदूषण होत आहे. याचा त्रास सहन करावा लागतो. ज्या रिक्षांना आरटीओ कार्यालयाचे परमिट नाही (पिवळी पाटी) त्या रिक्षा घरगुती वापरासाठी म्हणून पासिंग करून घेणेदेखील गरजेचे असताना अशा कोणत्याच नियमांचे पालन पनवेलमध्ये झालेले दिसून येत नाही.

## ग्राहकाची फसवणूक करणाऱ्या बिल्डरला तीन वर्षांचा कारावास

**खारघर : प्रतिनिधी**

उलवे येथील श्री साई होम्स बिल्डर अँड डेव्हलपर्सच्या नावाने उलवे सेक्टर १९ मधील श्री सिद्धी रेसिडेन्सी या गृहप्रकल्पातील दुसऱ्याच्या नावावर असलेला गाळा तिसऱ्याच व्यक्तीला विकुन या ग्राहकाकडून तब्बल १९ लाख रुपये उकळणाऱ्या बिल्डरला पनवेल न्यायालयाने तीन वर्षांची शिक्षा आणि ५० हजारांचा दंड ठोठावला आहे. या गुन्ह्यातील आरोपी कृष्णा सदाबहादूर सिंग सध्या एका गुन्ह्यात तळोजा कारागृहात शिक्षा भोगत आहे.

२०१८ साली नर्गिस लूफटे अली (वय ४६) महिलेने श्री सिद्धी रेसिडेन्सी या गृहप्रकल्पातील गाळा क्रमांक २ बुक केला होता.यावेळी बिल्डर कृष्णा सिंग व नर्गिस लूफटे अली यांच्यात एक करार देखील झाला. त्या करारानुसार अली यांनी टप्प्याटप्प्याने १९ लाख रुपये बिल्डरला चेक आणि आरटीजीएसद्वारे दिले. यांनतर संबधित गाळ्याच्या रजिस्ट्रेशनचा तगादा अली यांनी लावल्यावर बिल्डर कृष्णा सिंग व अश्विनी सिंग, मॅनेजर मुस्तकिनी शेख साथीदार टाळाटाळ करू लागले. काही दिवसात अली यांना आपली फसवणूक झाली असल्याचे लक्षात आले व त्यांनी फसवणूक करणाऱ्या बिल्डर व त्यांच्या साथीदारांवर एनआरआय पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. यांनतर आरोपीवर फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला. तपास अधिकारी संदेश कोठावले यांनी हा गुन्हा दाखल केला होता.

संबंधित प्रकरण अली यांनी पनवेल न्यायालयात २०२१ मध्ये दाखल केल्यानंतर दोन वर्ष चाललेल्या या खटल्यात सर्व बाजु तपासल्यानंतर न्यायमूर्ती एम डी सैंदाणे यांनी आरोपी क्रमांक १ कृष्णा सदाबहादूर सिंग याला फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २४८(२) द्वारे भारतीय दंड संहितेच्या कलम ३४ सह वाचलेल्या कलम ४२० अन्वये शिक्षापात्र गुन्ह्यासाठी दोषी ठरवत तीन वर्ष कारावास व ५०शु हजारांचा दंड सुनावला तसेच दंड न भरल्यास तीन महिने साधी कैद भोगावी लागेल असा निर्णय दिला आहे. या खटल्यातील आरोपी मुस्तकिनी शेख या फरार आहे. या खटल्यात पब्लिक प्रॉसिक्युटीव्ह म्हणून ए ए शेख यांनी काम पाहिले.

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शिक्षक पुरस्कार जाहीर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्य शासनाने आज समाजाची नि:स्वार्थ भावनेने आणि निष्ठेने सेवा करणाऱ्या शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांना सन २०२३-२४ या वर्षासाठीचे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शिक्षक पुरस्कार जाहीर केले आहेत. राज्यातील एकूण ११० शिक्षकांना हे पुरस्कार जाहीर झाले आहेत. दहा हजार रुपये आणि सन्मान चिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

प्राथमिक शिक्षक वर्गात ३८+१, माध्यमिक-३९, आदिवासी क्षेत्र-१९, थोर समाजसुधारक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार-८, विशेष शिक्षक कला/क्रिडा-२, दिव्यांग शिक्षक-१, स्काऊट/गाईड-२ असे एकूण १०९+१ पुरस्काराची संख्या आहे.

कोकण विभागातील पुरस्कार प्राप्त प्राथमिक शिक्षक पुढीलप्रमाणे. :- लक्ष्मण महादेव घागस, सहा. शिक्षक,जि.प.उच्च प्राथमिक शाळा, तोंडली केंद्र शिरवली, मुरबाड, जि. ठाणे, सचिन परशुराम दरेकर, सहा.शिक्षक, रायगड जि.प.शाळा,गोळेगणी, ता.पोलादपूर जि.रायगड, शिल्पा बळवंत वनमाळी, सहा. शिक्षक, जिल्हा परिषद शाळा, आगवन नवासाखरा केंद्र सावटे, ता.डहाणू ,जि.पालघर यांचा समावेश आहे.

पुरस्कार प्राप्त माध्यमिक शिक्षक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारे मनोज शालिग्राम महाजन, सहा.शिक्षक आयईएस नवी मुंबई हायस्कूल जि.ठाणे, रंजना दिलीप देशमुख , मुख्याध्यापक, अभिनव ज्ञानमंदिर प्र.शाला,कनिष्ठ महाविद्यालय,कर्जत, जि.रायगड, रामकृष्ण राजाराम पाटील, सहा.शिक्षक , पूज्य आचार्य भिसे माध्यमिक विद्यालय, कासा, जि.पालघर यांचा समावेश आहे.

आदिवासी शिक्षक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारे पुरस्कार प्राप्त सुधीर पुंडलिक भोईर,सहा. शिक्षक, जि.प.शाळा, रातांधळे ता.शहापूर, जि.ठाणे, सचिन परशुराम शिंदे, सहा.शिक्षक, श्रमजीवी जनता विद्यामंदिर पोशीर, ता.कर्जत जि.रायगड, रविंद्र मंगीलाल जाधव, सहा.शिक्षक, जि.प.दाभोण, पाटीलवाडा पो.रणकोळ, ता.डहाणू, जि.पालघर यांचा समावेश आहे.

## ‘आधार’चा गैरवापर करून योजनेतील पैसे लाटले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेद्वारे महिलांचे सशक्तीकरण करण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे. राज्यातील दोन कोटींहून अधिक महिला या योजनेसाठी पात्र ठरल्या आहेत, मात्र साताऱ्यात एका व्यक्तीने ३० जणांच्या आधार कार्डचा गैरवापर करून लाडकी बहीण योजनेचे तब्बल ३० अर्ज भरले आहेत. हा प्रकार खारघरमधील माजी नगरसेवक निलेश बाविस्कर यांच्या संपर्क कार्यालयातील तक्रारीमुळे उघडकीस आला आहे.

राज्यभरात महिलांच्या खात्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे जमा होत असताना या योजनेत काही गैरकारभार होत असल्याची तक्रार भाजपचे माजी नगरसेवक निलेश बाविस्कर यांनी पनवेलचे तहसीलदार यांना लिहिलेल्या पत्रात केली आहे.

खारघर शहरातील महिला पूजा प्रसाद महामुनी यांचा लाडकी बहीण योजनेंतर्गत अर्ज भरत असताना त्यांच्या आधार कार्डचा गैरवापर करून साताऱ्यामधील जाधव नामक तिऱ्हाईत व्यक्तीने आपल्या पत्नीच्या नावे या योजनेचा लाभ घेतला असल्याचे समोर आले आहे. महामुनी यांचा अर्ज वारंवार भरूनदेखील सबमिट होत नसल्याने त्यांनी भाजपचे खारघरमधील माजी नगरसेवक निलेश बाविस्कर यांच्या जनसंपर्क कार्यालयात याबाबत तक्रार केली.

माजी नगरसेवक बाविस्कर यांनी याबाबत तपासणी केली असता महामुनी यांच्या नावाने अर्ज अप्रूव्हड झाला असल्याचे त्यांना ऑनलाईन दिसून आले. त्या ठिकाणी मोबाईल नंबर मात्र साताराच्या जाधव नामक व्यक्तीचा असल्याचे दिसून आले. याबाबत अधिक माहिती मिळवली असता या व्यक्तीने आपल्या पत्नीच्या नावे एक नव्हे तब्बल ३० अर्ज भरल्याचे दिसून आले. बाविस्कर यांनी याबाबत त्वरित पनवेल तहसील कार्यालय गाठले आणि झालेल्या प्रकाराबाबत नायब तहसीलदार संजय भालेराव यांना माहिती दिली. या वेळी माजी नगरसेवक निलेश बाविस्कर यांच्यासोबत किरण पाटील, स्वतः तक्रारदार महिला पूजा महामुनी, कंचन कुमार बिरला आदी उपस्थित होत्या. त्यांच्यामुळे गैरप्रकार उघडकीस आला आहे.

## रामशेठ ठाकूर विद्यालयातील याकुब खानचे कॅरम स्पर्धेत यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या याकुब रईस खान याची जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

राज्य क्रीडा व युवक संचलनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी व पनवेल महापालिका यांच्या वतीने तालुकास्तरीय कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या याकुब खानने प्रथम क्रमांक मिळविला, त्याची निवड जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेसाठी झाली आहे.

या यशाबद्दल प्राचार्या निशा नायर यांनी याकुबचे आणि क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील, संभाजी जाधव यांचे अभिनंदन केले. यासोबतच संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी.देशमुख, बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, सचिव डॉ. एस.टी.गडदे, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी आदींनी याकुबचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## गणेशमूर्तींवर कारागिरांचा फिरतोय अखेरचा हात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपलेल्या गणरायांच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर गणेशमूर्तीचे रंगकाम अंतिम टप्प्यात आले असून शहरासह ग्रामीण भागातही मूर्तिकार रंगकामात दिवस-रात्र मग्न असलेले पहावयास मिळत आहेत. मोहोपाडा येथील मुर्तीकार मनोहर धोत्रे यांनी सालाबादप्रमाणे बुकींगच्या ३०० व इतर १५ आकर्षक गणेशमुर्ती साकारल्या आहेत. या श्री गणेशमुर्तीचे काम श्रावण महिना संपण्यापुर्वीच पुर्ण करण्याची प्रथा आहे.

मूर्तिकार, रंगकाम करणारे कारागीर गणेशमूर्तीवर शेवटचा हात फिरवत असून मूर्ती विक्रेत्यांनी ठिकठिकाणी गणेशमूर्ती विक्रीला ठेवून विक्रेते गिऱ्हाईकांची प्रतीक्षा करत असल्याचे चित्र सर्वत्र आहे. गणेशमूर्तीला रंग देण्याच्या कामाला गती मिळाली. असून यावर्षी तालुक्यातील गणेश मंडळांनी गणेश सोहळा साजरा करण्यासाठी पंधरा दिवस अगोदरच गणेशमूर्तीची



मागणी केली आहे. यामुळे प्रत्येक कारागिरांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

गणेशमूर्तीवर अखेरचा हात फिरत असताना मूर्तीचा जीव असणारे डोळे, किरीट, त्रिशूल, गंडक आदीचे रंगकाम अंतिम टप्प्यात आले आहे. यामध्ये मूर्ती आकर्षक व रेखीव दिसण्यासाठी डोक्याच्या किरीटास सोनेरी, सिंहासनास फिकट गुलाबी, पाठीमागील आसनास लाल, हिरवा, पिवळा, केशरी आदी रंगांनी गणेशमूर्तीचा पुरवठा केला जात असून मोहोपाडा येथील गणेशमूर्ती साकारण्यासाठी मनोहर धोत्रे यांना त्यांची पत्नी व मुलगी मदत करताना दिसत आहेत.

धोत्रे कुटूंबाने आकर्षक गणेशमूर्ती साकारल्या आहेत. त्यामुळे ग्राहकांचा या डिझाईनच्या गणेशमूर्ती खरेदी करण्याकडे कल आहे. घरगुती पूजेच्या मूर्तींना खूप मागणी वाढली आहे. यामुळे सध्या शहराप्रमाणेच ग्रामीण भागातही गणेशोत्सवाची चाहूल लागल्याने गणेशमूर्ती रंगविण्याच्या व विक्री करण्याच्या कामाला वेग आला आहे.

## नवी मुंबईतील शिक्षकांचा सन्मान

**नवी मुंबई : बातमीदार**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून संदिप नाईक प्रतिष्ठानच्या वतीने मंगळवार २ सप्टेंबर रोजी नवी मुंबईतील शिक्षकांचा प्रातिनिधिक सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्या हस्ते शिक्षकांना शाल प्रमाणपत्र आणि चषक देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.



नेरूळ येथील तेरणा कॉलेजच्या सभागृहात या सन्मान सोहळ्याला शिक्षकांची भरगच्च उपस्थिती लाभली. माजी महापौर जयवंत सुतार, माजी विरोधी पक्ष नेते दशरथ भगत, माजी सभागृह नेते रवींद्र इथापे, स्थायी समितीच्या माजी सभापती नेत्रा शिर्के, सभापती डॉक्टर जयाजी नाथ, माजी नगरसेवक सुरज पाटील, माजी नगरसेवक अशोक गुरखे, नांदुगडे, मनोहर सुळे, मुकेश पष्टे, प्राचार्य प्रताप महाडिक यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

## गणेशोत्सवासाठी ढोल-ताशा पथकांचा जोरदार सराव

**पनवेल : वार्ताहर**

गणेशोत्सवासाठी ढोल-ताशा पथकांचा सराव अंतिम टप्प्यात आला आहे. पनवेल परिसरातील अनेक ठिकाणी असलेल्या उड्डाणपुलाखाली अनेक ठिकाणी चौकाचौकांत मोकळ्या जागेवर, गच्चीवर ढोल-ताशा पथकांचा जोरदार सराव सुरू आहे.

गणेश उत्सवानिमित्त जवळपास दीड महिना आधीपासून सराव सुरू आहे. नियमित पथकातील सदस्यांचा दिनक्रम पूर्ण करून सायंकाळी सहा ते नऊ या वेळेत सराव चालतो. पथकात साधारण आठ वर्षे वयोगटापासून ते ४५ वर्ष वयोगटापेक्षा शंभर ते दोनशेपेक्षा अधिक सदस्यांचा सहभाग असतो. काही पथक



सदस्याकडून शुल्क घेतात, तर काही घेत नाहीत, सध्या तरुणाईचा ढोल-ताशा मंडळांमध्ये सहभाग होण्यासाठी मोठा उत्साह दिसत आहे. यासाठी मुलाखतही घेतली जाते, यात एक ते पाच असे पारंपरिक ताल असतात. याला पारंपरिक हात चालवण असे संबोधले जाते.

मिरवणुकीमध्ये सहभागी भक्तांना आनंद मिळेल अशा ठेक्यांना अधिक पसंती मिळत आहे. सध्या गणेशोत्सव, नवरात्रोत्सव सार्वजनिक मिरवणूक, जयंती मिरवणूक, पाडवा अशा विविध सणांना ढोल-ताशा पथकांची मागणी आहे.

प्रत्येक ढोल-ताशा पथकाचे स्वतःचे काही नियम आहेत. त्यामध्ये व्यसनाधीनता व गैरवर्तन चालत नाही, सरावात नियमित हजर राहणे, गणवेश परिधान करणे, मुलींनी मुलींचा ढोल स्वतः उचलावा यामध्ये पालकांची परवानगी आवश्यक असते. पथकात प्रमुख्याने ढोल, ताशा, टोल, ध्वज, ध्वजावर मानाचा कळस, टोल गाडी व झांजचा समावेश असतो.

निवडक

### संत बाळूमामा मंदिरात गर्दी



**चौक** : सोमवती अमावस्या असल्याने लोणावळा येथील पांगोळी या निसर्गरम्य गावी असलेल्या श्री संत बाळूमामाच्या मंदिरात भक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. मुंबई आणि पुणे जिल्ह्याच्या मध्यवर्ती हे मंदिर असल्याने अनेक ठिकाणाहून भक्त या ठिकाणी येत असतात. या सगळ्या भक्तांच्या भंडाऱ्यांची व्यवस्था संत श्री बाळूमामा देवस्थान ट्रस्टच्या वतीने केली होती. रोजच या मंदिरात दर्शनासाठी अनेक भक्त येत असल्याचे देवस्थान विश्वस्त ट्रस्ट प्रमुख बबन खरात यांनी सांगितले.

### मोर्बा येथील विवाहितेची आत्महत्या

**माणगाव** : तालुक्यातील मोर्बा येथील २५ वर्षीय विवाहितेने पतीसोबत झालेल्या भांडणाच्या रागातून गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेची खबर सुहेल मुसबहा चौधरी (वय ३०, रा. मोर्बा) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली. मयत महिला शहीदा सुहेल चौधरी हिने तिच्या पतीसोबत झालेल्या भांडणाच्या रागातून तिच्या राहत्या घरातील लोखंडी पाईपला काळ्या रंगाच्या ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या केली. तिला उपजिल्हा रुग्णालयात आणले असता येथील डॉक्टरांनी तिला तपासून मृत घोषित केले. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### नागोठण्यात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**नागोठणे** : नागोठणे लायन्स क्लब यांच्या माध्यमातून स्व. श्वेता विवेक सुभेकर यांच्या स्मरणार्थ विवेक सुभेकर यांच्या सौजन्याने तसेच आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.४) येथील स्व. बाळासाहेब ठाकरे बालोद्यान कचेरी शाळा येथे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शस्त्रक्रियेसाठी येताना आधार कार्ड व रेशन कार्ड (पिवळे किंवा केशरी) आणावे, आपली सध्या चालू असलेली औषधे सोबत आणावी तसेच याबाबत अधिक माहितीसाठी विवेक सुभेकर (९२७०४९९११३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### कर्जतच्या तहसीलदारपदी धनंजय जाधव




**कर्जत** : कर्जतचे तहसीलदार डॉ. शीतल रसाळ यांची बदली झाल्यामुळे त्या रिक्त झालेल्या जागेवर धनंजय नारायणराव जाधव यांची नियुक्ती झाली आहे. त्यांनी आपला पदभार काल सायंकाळी स्वीकारला. जाधव यांनी यापूर्वी कुर्ला विभागातील मुलुंड येथे तहसीलदार म्हणून काम पाहिले असून त्यापूर्वी ते पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात गृहशाखेत कार्यरत होते.

# आदिवासी बांधवांना हक्काचे धान्य द्या

## भाजप आक्रमक; रोहा तहसीलदारांना दिले निवेदन

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील घोसाळे ग्रामपंचायत हद्दीतील मुकटे आदिवासीवाडीतील बांधवांना गेल्या दोन महिन्यांचे मोफत धान्य ठेकेदाराने न दिल्यामुळे भाजप रोहा तालुका उपाध्यक्ष शिवाजी जाधव यांच्या नेतृत्वाखाली नायब तहसीलदार मोकल त्यांना सोमवार (दि.२) निवेदन देण्यात आले.



ऐन सणासुदीच्या काळातही ठेकेदाराने धान्य न दिल्यामुळे आदिवासी बांधव चांगलेच आक्रमक झाले. अशा मुजोर ठेकेदाराचा परवाना रद्द करण्याची मागणी तहसीलदार यांच्या निवेदनाद्वारे करण्यात आली.

भाजप तालुका उपाध्यक्ष शिवाजी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे १२० आदिवासी बांधवांसह तहसीलदार कार्यालयात धडक दिली. ठेकेदाराने रेशन कार्डवर साखर दिली गेल्याची नोंद केली आहे, मात्र प्रत्यक्षात साखर आदिवासी लोकांना मिळालीच नाही. ठेकेदार आदिवासी बांधवांना कायमच उडवाउडवीची उत्तरे देतो. अनेक तक्रार पुरवठा विभागात केलेल्या आहेत, मात्र कारवाई होत नाही. त्यामुळे पुरवठा अधिकारी व ठेकेदारांचे साटेलोटे आहे का? असा संशय येऊ लागला आहे.

गेल्या सहा महिन्यांपूर्वी याच ठेकेदाराचे धान्य गुरांच्या गोठ्यात आदिवासी लोकांनी पकडले होते. कारवाई करण्याचे आदेश दिले होते, परंतु प्रत्यक्षात मात्र कारवाई होत नाही. त्यामुळेच आज ठेकेदार मुरूड व इतर ठिकाणी लोकांच्या हक्काचे धान्य विकतो. त्यामुळे आता या ठेकेदाराचा परवानाच रद्द करावा, अशी मागणी उपाध्यक्ष शिवाजी जाधव यांनी केली.

यानंतर एक बैठक घेण्यात आली. ग्रामस्थांनी ज्या मागण्या केल्या त्याचा अहवाल तयार करून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात येणार आहे. ग्रामस्थांच्या तक्रारीनुसार ठेकेदार जर दोषी असेल त्या कारवाई होणारच, तसेच ज्या कुटुंबियांना धान्य मिळाले नाही अशा सर्व रेशन कार्डधारकांना स्वतः उपस्थित राहून धान्य देण्याचे आश्वासन पुरवठा अधिकारी उज्ज्वला अंधेरी यांनी दिले.

## पेण येथे बालसंरक्षण, सतर्कता व सुरक्षितता जनजागृतीपर अभियान

### रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचे मार्गदर्शन

**पेण : रामप्रहर वृत्त**

सुहीत जीवन ट्रस्ट पेण येथे बालसंरक्षण, सतर्कता व सुरक्षितता अभियान, २०२४ हा जनजागृतीपर कार्यक्रम झाला. सध्याची परिस्थिती, सामाजिक मानसिकता याचा विचार करून संस्थेने हा अत्यंत उपयुक्त व अनोखा जनजागृतीपर उपक्रम आयोजित केला होता.



या वेळी व्यासपीठावर रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, बाल न्यायमंडळ रायगड, सदस्य डॉ. नीता कदम, पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मंगेश नेने, पेण वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बागुल, सिद्धी प्रिंटर्सचे भूषण पाठक, ट्रस्टच्या अध्यक्ष डॉ.सुरेखा पाटील व सचिव वरूण पाटील उपस्थित होते.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी, खाकी वर्दीतला पालक या नात्याने सुहित जीवन ट्रस्टच्या गतिमंद मुलांशी अत्यंत जिव्हाळ्याचा संवाद साधला, तसेच सर्व पोलीस आपले पाठीराखे आहेत याची या कार्यक्रमातून जाणीव करून दिली. समाजातील सर्वच स्तरात सावधानता, संवेदनशीलता व सतर्कता असणे गरजेचे आहे हा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला, तसेच समाजात चुकीचे वागणाऱ्यांची कधीच गय केली जाणार नाही असाही दम देण्यात आला. संस्थेचे कार्य पाहून मी अतिशय भारावून गेलो असेही गौरवोद्गार घार्गे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेच्या शिक्षिका अपर्णा जाधव यांनी केले.

## ज्येष्ठांनी सुरक्षिततेविषयी जागृत रहावे -उदय झावरे

**मुरूड : प्रतिनिधी**

ज्येष्ठ नागरिक संघ हे चालते बोलते व्यासपीठ असते. वयोवृद्ध लोकांचे जीवन शांततामय आणि निरोगी असले पाहिजे. या वयात ताणतणाव सहन होत नाही. समाज घटकांकडून आपुलकीची अपेक्षा असते. ज्येष्ठ नागरिकांनी उतारवयात सुरक्षिततेविषयी जागृत रहावे, असे आवाहन मुरूड पोलीस निरीक्षक उदय झावरे यांनी केले.

या वेळी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष नयन कर्णिक, उपाध्यक्ष शकील कडू, बाळकृष्ण कासार, प्रमोद मसाल, रमेश कवळे, नैनिता कर्णिक, वैशाली कासार, अनघा चौलकर, प्रा. एम. एस. जाधव आदी उपस्थित होते.


निरीक्षक झावरे पुढे म्हणाले की, अलिकडे सायबरचे गुन्हे वाढू लागले आहेत. तेव्हा कुठल्याही अनोळखी व्यक्तीला दूरध्वनीवर कुठलीही जास्तीची माहिती देऊ नये असे सूचित केले. या वेळी बाळकृष्ण कासार यांनी, शहरातील मोकाट जनावरांचा प्रश्न उपस्थित केला आहे, तसेच धूमस्टाईल दुचाकीस्वार, भाजीमार्केटमधील वाहतूक कोंडी व इतर समस्या मांडल्या. शकील कडु, नयन कार्णिक, रमेश कवळे, प्रमोद मसाल आदींनी चर्चेत सहभाग घेतला. वाहतूक सुरळीत करण्यासाठी ५ ते १५ सप्टेंबरपर्यंत बाजारातून एसटी वाहतूक अन्य मार्गाने करावी, असे आगार व्यवस्थापकांना सांगितल्याचे झावरे यांनी नमूद केले.



## माथेरान प्रवासी कर संकलन ठेक्याचा लिलाव

**माथेरान : प्रतिनिधी**

शहरात प्रवेश करणाऱ्या पर्यटकांकडून प्रवासी आणि स्वच्छता कर आकारला जातो. प्रवासी कर संकलन करण्याचा ठेका लिलावात दि बाईक हॉस्पिटॅलिटी कंपनीने मिळविला आहे. या कंपनीने स्पर्धक दोन कंपन्यांना मागे टाकत १३ कोटी २१ लाखांना हा प्रवासी कर संकलनाचा ठेका मिळविला.




२०२४ ते २०२६ या कालावधीत माथेरान शहरात पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांकडून प्रवासी आणि स्वच्छता कर वसूल केला जातो. या निधीमधून माथेरान नगर परिषद शहरातील विकासकामे करीत असतात. माथेरान पालिकेकडून मागील दीड वर्षे प्रवासी कर संकलन करीत होते. त्यामुळे पालिकेने जुलै २०२४मध्ये निविदा काढली होती. त्यांनतर या निविदेनुसार २९ ऑगस्ट रोजी लिलाव सुरू झाला.

हा ठेका मिळविण्यासाठी माथेरान पालिकेकडे विकास कन्स्ट्रक्शन, फायरविंग इन्फ्राकॉन सर्व्हिसेस आणि दि बाईक हॉस्पिलिटी या कंपन्यांनी सहभाग घेतला होता. बोलीमध्ये बाईक हॉस्पिटॅलिटी ही कंपनीने लावलेली १३ कोटी २० लाख ८० हजार ही बोली सर्वाधिक ठरली. त्यामुळे या कंपनीला माथेरान नगर परिषदेमधील प्रवासी कर संकलनाचा ठेका मिळविला.

नगरपालिकेचे रोखपाल अंकुश ईचके यांनी सांगितले की, माथेरान नगर परिषदेमधील प्रवासी कर संकलनाचा ठेका २०१९मध्ये बाईक हॉस्पिटॅलिटी कंपनीने मिळविला होता, मात्र ठेका अर्धवट सोडल्याने त्या कंपनीला ब्लॅक लिस्ट करताना ७२ लाख ६८ हजारांची थकीत रक्कम निश्चित करण्यात आली होती. त्या वेळी कंपनीकडील ६१ लाख अनामत रक्कम असल्याने ती जप्त करून थकीत रक्कम ११ लाख रुपये शिल्लक राहिली होती.

२०२४ ते २०२६ या कालावधी साठी ठेकेदार निश्चित करण्यासाठी निविदा निघाल्यानंतर बाईक हॉस्पिटॅलि कंपनीने थकीत ११ लाख आणि व्याजाची दोन लाख अशी १३ लाखांच्या रकमेचा धनादेश जुलैअखेरीस पालिकेकडे दिला आणि प्रवासी कर निविदेत सहभाग घेतला. त्यामुळे पालिकेने या कंपनीला लिलावामध्ये सहभागी करून घेतले होते.

## अलिबाग मेढेखार येथील जमीन मूळ किमतीत परत करण्याचे आदेश

**अलिबाग : प्रतिनिधी**

पटनी एनर्जी प्रकल्पासाठी अलिबाग तालुक्यातील मेढेखार येथील शेतकऱ्यांकडून विकत घेतलेली ८९ हेक्टर जमीन निर्धारित कालावधीत औद्योगिक कारणासाठी वापरत न आणल्यामुळे शेतमालकांना मूळ किमतीत परत करावी, असे आदेश देण्यात आले आहेत.

२००६ साली पटनी एनर्जी प्रा.लि. मुंबई यांनी विकास आयुक्त, उद्योग यांची परवानगी घेऊन मेढेखार येथील एकूण क्षेत्र ८९-९०-२० हे. आर जमीन औद्योगिक वापरासाठी खरेदी केल्या. विकास आयुक्त उद्योग यांनी सदर जमिनी आदेशांपासून पाच वर्षांत औद्योगिक वापरात आणण्याचे निर्देश दिले होते. त्याचबरोबर जर त्या वापरात आणल्या नाही तर मूळ मालकास मूळ किमतीला परत देण्याची अट घातली होती. मेढेखार येथील शेतकऱ्यांनी २००६ ते २००८ या कालावधीत जमिनी विकल्या होत्या. २०१२पर्यंत ना उद्योग ना नोकरी अशी अवस्था तेथील शेतकऱ्यांची झाली होती. खारभूमी विभागाने संरक्षक बंधारे न काढल्याने देहन कोनी, कालवड खार व मेढेखार येथील जमिनी नापीक केल्यामुळे शेतीदेखील करता येत नव्हती. म्हणून २०१३मध्ये मेढेखार येथील शेतकऱ्यांनी श्रमिक मुक्ती दल अध्यक्ष डॉ. भारत पाटणकर यांची भेट घेऊन लढ्याचे नेतृत्व करण्याची विनंती केली होती.

महाराष्ट्र कुळ वहिवाट व शेतजमीन कायदे सुधारणा अधिनियम २००४च्या तरतुदीनुसार एकूण १५ वर्षांचा कालावधी संपुष्टात झाला असल्याने सदर जमिनी मूळ मालकाने ज्या किमतीला विकली होती तितक्याच किमतीला खरेदी करण्याचा हक्क प्राप्त झाला आहे. तसा आदेश मोजे मेढेखार येथील एकूण १८७ स.न एकूण क्षेत्र ८९-९०-२० हे. आर जमिनीस ज्या २००६ ते २००७ कालावधीतील खरेदी व्यवहारांना लागू केला आहे.

२०२३साली रायगडचे तत्कालीन अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव यांनी महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८चे कलम ६३एक-अ मधील तरतुदीनुसार प्राप्त अधिकारान्वये पटनी एनर्जी प्रा.लि. कंपनीने खरेदी केलेल्या जमिनी मूळ खरेदी किमतीला मूळ शेतकरी किवा त्यांचे कायदेशीर वारसाना पुनश्च खरेदी देण्यासंदर्भात आदेश पारित केले. श्रमिक मुक्ती दलाचे कार्यकर्ते राजन वाघ यांना आदेशाची प्रत मिळाली आहे.

## कर्जतमध्ये शांतता समितीच्या सभेत विविध विषयांवर चर्चा

**कर्जत : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमिवर शांतता समितीची बैठक झाली. या सभेत विविध विषयांवर चर्चा होऊन उपस्थित समस्या सोडविण्याच्या सूचना अधिकारी वर्गाला देण्यात आल्या.




सभा उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या वेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डी. डी. टेळे, तहसीलदार धनंजय जाधव, पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड, गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे, परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी तथा अप्पर तहसीलदार दुर्गा देवरे, नायब तहसीलदार सचिन राऊत, मुख्याधिकारी वैभव गारवे आदी उपस्थित होते.

पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांनी, आपल्या हद्दीत २७ सार्वजनिक गणेश मंडळे आहेत. प्रत्येक मंडळाला बंदोबस्त देण्याचा प्रयत्न आम्ही करू. त्यासाठी होमगार्ड उपलब्ध झाल्यास त्यांचे सहकार्य घेऊ. शहरात ग्रामसेवक, तलाठी, पोलीस पाटील यांच्या नेमणुका कराव्यात म्हणजे ते भाविकांना सूचना देतील. कर्जत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ व दहिवलीचे गणेशोत्सव मंडळ विसर्जनाचे स्वतःच आयोजन करतात. शक्यतो गणेशघाटांवर सीसीटीव्ही लावावेत, अशी सूचना केली. नदीवर विसर्जन करताना कोणतीही दुर्घटना होऊ नये याची काळजी घेणे, ग्रामीण भागात प्रश्न येत नाही. जेथे मोठ्या प्रमाणात विसर्जन होते तेथे काळजी घेणे महत्त्वाचे आहे. मंडळांचे स्वयंसेवक महिला ब पुरुषबळ असावेत, अशा सूचना केल्या.

भाजपचे उदय पाटील यांनी, परप्रांतीयांची संपूर्ण माहिती ग्रामपंचायतीमध्ये असावी, असे सांगितले. उत्सवाचा विचार करता परिवहन विभागाने वेळीच नियोजन करावे. दोन दिवस गर्दी असेल त्यासाठी वेगवेगळ्या भागात जाण्यासाठी एसटी बस ठेवाव्यात. अशा सूचना करण्यात आल्या. मुख्याधिकारी वैभव गारवे यांनी, गणेशघाट चार आहेत तेथे सफाई व विजेची व्यवस्था करण्यात येईल, असे सांगितले.

राजेश लाड यांनी अद्याप बंधऱ्याला झडपा लागल्या नाहीत. गणेशमूर्ती विसर्जनाला अडचण होईल, अशी सूचना केली. त्यावर पावसाचा अंदाज घेऊन त्या लावल्या जातील, असे गारवे यांनी सांगितले. संजय मोहिते यांनी गणेशोत्सव काळात पाणी व वीज असावी, असे सूचित केले.

नदीम खान यांनी, मस्जिदीजवळचा पोलिसांचा पिंजरा थोडा बाजूला ठेवा म्हणजे गैरसमज होणार नाही, अशी विनंती केली. रणजित जैन यांनी इंग्लिश मिडियम स्कूल ते जुना छत्री उत्पादन कारखाना दरम्यानच्या रस्त्यावर पाणी साचते. त्यावर उपाय करण्याची मागणी केली. तेथे तातडीने अभियंत्यास पाठवून ती समस्या सोडवू, असे मुख्याधिकारी गारवे यांनी सांगितले. मोहन ओसवाल यांनी पाणीपुरवठा वेळेवर करावा, असे सूचित केले. भाई गायकर, सुरेश बोराडे, रोहित ओसावल, जितेंद्र ओसवाल आदींनीही समस्या मांडल्या. त्यावर डी. डी. टेळे व प्रकाश संकपाळ यांनी गणेशोत्सव चांगल्या प्रकारे साजरा करूया, असे आवाहन केले.

## मुरूड बाजारपेठेत गणेशोत्सवाचे पारंपरिक साहित्य विक्रीस दाखल

**मुरूड : प्रतिनिधी**

चालू आठवड्यातच गणेशोत्सवाला सुरुवात होणार असून गणपतीजवळ बांधण्याकरिता आवश्यक असणारे कवंडाळ, पिंगवी फळ व ओवसाकरिता लागणारी सुपे मुरूड बाजारपेठेत विक्रीसाठी दाखल झाले आहेत.

अलिबाग येथील बुरमखाण येथील अलका जाधवे या महिलेने ओवसाकरिता लागणारे सुप बाजारपेठेत विक्रीसाठी आणले आहे. एक सुप १२० रूपयांना विक्री केली जात आहे.




# बांगलादेशचा ऐतिहासिक मालिका विजय

## दुसऱ्या कसोटीतही पाकिस्तानला नमवले

**रावळपिंडी : वृत्तसंस्था**

बांगलादेश क्रिकेट संघाने पाकिस्तानविरूद्धच्या कसोटी मालिकेत इतिहास घडवला आहे. बांगलादेशने पाकिस्तानचा त्यांच्या घरच्या मैदानावर कसोटी सामन्यात दारुण पराभव केला. बांगलादेशने पाकिस्तानला रावळपिंडी येथील दुसऱ्या कसोटीत सहा विकेट्सने पराभूत केले. या पराभवासह बांगलादेशने २–० ने मालिका आपल्या नावे केली आहे.

दुसऱ्या कसोटी सामन्याची नाणेफेक जिंकत बांगलादेशने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पावसामुळे कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवसाचा खेळ रद्द करण्यात आला. दुसऱ्या दिवशी पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करताना २७४ धावा करत सर्वबाद झाले, ज्यात बांगलादेशच्या गोलंदाजांनी चमकदार कामगिरी केली, तर बांगलादेशचा संघही २६२ धावा करत सर्वबाद झाला. बांगलादेशकडून लिटन दासने १३८ धावांची उत्कृष्ट खेळी केली, तर मेहदी हसनने ७८ धावांची निर्णायक खेळी केली.



१२ धावांच्या आघाडीसह पाकिस्तानने दुसरा डाव सुरू केला, पण संघ १७२ धावा करत सर्वबाद झाला. यासह बांगलादेशला विजयासाठी १८५ धावांचे आव्हान मिळाले होते, जे त्यांनी सहा विकेट्स राखत गाठले.

१८५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या बांगलादेशच्या झाकीर हसन (४०) आणि शादमान इस्लाम (२४) यांनी पहिल्या विकेटसाठी ५८ धावांची भागीदारी रचली. यानंतर कर्णधार नजमुल हुसेन शांतोने ३८ धावांची, तर मोमिनुल हकने ३४ धावांची खेळी खेळून संघाला विजयाच्या जवळ नेले. हे दोघेही बाद झाल्यावर मुशफिकुर रहीम व माजी कर्णधार शकीब अल हसन यांनी अनुक्रमे नाबाद २२ आणि नाबाद २१ धावांची खेळी खेळून बांगलादेशच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.



## ‘आरडीसीए’ला मध्यवर्ती कार्यालयास जागा मिळावी; ना. चव्हाणांना निवेदन

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)च्या मध्यवर्ती कार्यालयासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची जागा मिळावी यासाठी जिल्हाध्यक्ष अनिरुद्ध पाटील, उपाध्यक्ष राजेश पाटील, कौस्तुभ जोशी यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

पेण नगरपालिकेच्या क्रीडांगणालगत सार्वजनिक बांधकाम विभागाची पडीक असलेली जागा आहे. या जागेचा विनियोग अन्य कोणत्याही कारणासाठी होत नसून ती जागा जर आरडीसीएच्या मध्यवर्ती कार्यालयासाठी कायमस्वरूपी किंवा भडेकरारावर उपलब्ध करून दिली तर संपूर्ण जिल्ह्यातील क्रिकेट असोसिएशनचे पदाधिकारी, सदस्य व खेळाडूंना त्याचा फायदा होणार आहे. मंत्री रवींद्र चव्हाण यांनी या जागेचा प्रस्ताव तयार करून शासनाच्या नियमावलीत बसवून ही जागा आरडीसीएला मध्यवर्ती कार्यालयासाठी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन या वेळी दिले.

## लॉर्ड्स मैदानावर रंगणार ‘डब्ल्यूटीसी’ची फायनल

**दुबई : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) जागतिक अजिंक्यपद कसोटी (डब्ल्यूटीसी) स्पर्धेच्या अंतिम सामन्यासंदर्भातील घोषणा केली आहे. चांदीच्या गदा आणि प्रतिष्ठित ट्रॉफीसाठीची फायनल लढत क्रिकेटची पंढरी समजल्या जाणाऱ्या लॉर्ड्सच्या मैदानात खेळवण्यात येणार आहे. ११ ते १५ जून २०२५ या कालावधीत डब्ल्यूटीसीच्या तिसऱ्या हंगामातील फायनल खेळवण्यात येईल. या सामन्यासाठी १६ जून हा राखीव दिवसही ठेवण्यात आला आहे.

या स्पर्धेतील पहिल्या दोन्ही हंगामातील फायनल लढती या इंग्लंडमधील मैदानातच खेळवण्यात आल्या होत्या. २०२१मध्ये भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील फायनल सामना साउथहँप्टनच्या मैदानात खेळवण्यात आला. न्यूझीलंडच्या संघाने भारताला शह देत पहिल्यांदा चांदीची गदा पटकावली होती. २०२३च्या हंगामातही भारतीय संघाने फायनल गाठली. हा सामना



द ओव्हलच्या मैदानात रंगला. तेथे ऑस्ट्रेलियन संघाने भारताला पराभूत करत अजिंक्यपद पटकावले होते.

आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या तिसऱ्या हंगामातही भारतीय संघ प्रबळ दावेदार आहे. या स्पर्धेतील फायनल खेळण्याच्या शर्यतीत टीम इंडिया आघाडीवर आहे. लॉर्ड्सच्या मैदानात पहिल्या दोन हंगामातील चुका टाळून आयसीसीच्या सर्व स्पर्धा जिंकण्याचा पराक्रम करण्यासाठी टीम इंडिया प्रयत्नशील असेल. या वेळीही भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात पुन्हा कडवी टक्कर दिसत आहे.



















**पनवेल : कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून मतदारसंघात विकासकामांचा झंझावात सुरू आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांना विविध सोयीसुविधा उपलब्ध होत असून विकासाची अनेक कामे मार्गी लागत आहे. त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या २५:१५ निधीमधून सुमारे ७८ लाख रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आला. या वेळी भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, युवा नेते दशरथ म्हात्रे यांच्यासह सरपंच, उपसरपंच, सदस्य, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.**












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com